महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन: मुंबई सह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Maharashtracrimetimes.com | MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

मूल्य २/- रुपये

• संपादकः राकेश शंकर गोरे | वर्षः १५, अंकः २७, पृष्ठः ८ | मुंबई, मंगळवार १ ऑक्टोबर २०२४ ते सोमवार ७ ऑक्टोबर २०२४ • POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 • RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301

## संक्षिप्त

### मेट्रोमुळे मुंबईच्या रिअल इस्टेट क्षेत्रातील तेजीचा मार्ग होईल मोकळा

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

मुंबई शहरात मेट्रोच्या महत्त्वाकांक्षी विस्तारामुळे येथील रिअल इस्टेटची बाजारपेठ क्रांती घडविण्याच्या मार्गावर आहे. बांधकाम क्षेत्रात मोठ्या उलाढाली होऊ घातल्या असून त्यांतील कर्मचारी अथक परिश्रम करीत आहेत, तर दुसरीकडे मेट्रोसारख्या प्रगत वाहतूक सेवेमुळे कनेक्टिव्हिटी वाढून शहराचा चेहरामोहरा



बदलू लागला आहे. साहजिकच शहरातील मालमत्तांचे मूल्य वेगाने वाढू लागले आहे. पायाभूत सुविधांच्या विकासातील या वाढीमुळे मुंबईचा दर्जा भारताचे आर्थिक केंद्र म्हणून उंचावतोच, त्याशिवाय मेट्रो मार्गालगतचे क्षेत्र गुंतवणुकीसाठी अत्यंत आकर्षक होत आहे. दळणवळणाच्या या चांगल्या सुविधेमुळे, निवासी आणि व्यावसायिक अशा दोन्ही जागांमध्ये ग्राहकांचे स्वारस्य वाढताना दिसून येत आहे. त्यामुळे एक तेजस्वी स्वरुपाची रिअल इस्टेटची बाजारपेठ तयार होत आहे. मेट्रो ही केवळ प्रवासाची सोय नसून प्रगतीस चालना देणारी ती एक उत्तम संधी आहे.

### मनसेचा मोठा निर्णय, नागपूरमध्ये देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधात निवडणूक लढणार? उमेदवारही ठरला?

■ मुंबई : गणेश बागडे

विधानसभा निवडणुकीची तयारी सर्वच पक्ष करत आहेत. लोकसभेला बिनशर्त पाठिंबा देणार असं विधान मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी केलं होतं. मात्र आता विधानसभेसाठी मनसे स्वबळावर लढणार आहे. विधानसभा निवडणुकीत



२२० ते २४० जागा लढणार असल्याचं राज ठाकरे यांनी घोषित केलं आणि त्या अनुषंगाने महाराष्ट्रात राज ठाकरे यांनी दौरा सुरू केला आहे. राज ठाकरे यांनी नुकताच विदर्भाचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी विदर्भातील प्रमुख पदाधिकाऱ्यांशी चर्चा करत मतदारसंघाचा आढावा घेतला. मनसेनं नागपूरमधून देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधात लढण्याची तयारी सुरू केलीय. राज ठाकरेंनी नागपूरमधील सर्व ६ विधानभा जागांवर लढण्याची तयारी करा असे आदेश दिल्याचं स्थानिक मनसे त्यांनी सांगितलंय. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर दक्षिण पश्चिम विधानसभा मतदारसंघात मनसे उमेदवार देणार असल्याचं जवळपास निश्चित झाल्याचं समजतंय. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दक्षिण पश्चिम विधानसभा मतदारसंघात वंचित पाठोपाठ मनसेही उमेदवार देण्याच्या तयारीत आहे.

# महायुती सरकारचा सर्वांत मोठा निर्णय; गोमातेला मिळाला 'राज्यमातेचा दर्जा'

### कोतवालांच्या मानधनात दहा टक्के वाढ. अनुकंपा धोरणही लागू



### सेवानिवृत्ती उपदान, मृत्यू उपदानाची मर्यादा वाढवून २० लाख

## विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्या अगोदरच मंत्रीमंडळाचे ३८ महत्वपूर्ण निर्णय

■ मुंबई : विशाल कारंडे

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीपूर्वीच राज्य मंत्रिमंडळात बैठकीचे सत्र सुरु आहे. विधानसभा निवडणुकीची आदर्श आचारसंहिता केव्हाही लागू होणार असल्याने मोठे निर्णय घेण्यात आले. विद्यमान सरकारचा कार्यकाळ २६ नोव्हेंबर रोजी संपत असून त्याआधी निवडणुका होणार आहेत. आजच्या मंत्रीमंडळ बैठकीत तब्बल ३८ निर्णय घेण्यात आले आहेत. तसेच राज्य सरकारने गायीला 'राज्यमाता-गोमाते' चा दर्जा जाहीर केला आहे. निवडणुकीआधीच हा निर्णय घेण्यात आल्याने सरकारचा हा मास्टर स्ट्रोक मानला जात आहे. या निर्णयामध्ये राज्यातील देशी गायींना 'राज्यमाता- गोमाता' हा दर्जा देण्यात आला आहे. त्यासंदर्भातील जीआर देखील राज्य सरकारने काढला आहे. हिंदू धर्मामध्ये गाय पवित्रतेचे, मांगल्याचे प्रतीक समजले जाते. भारतीय परंपरेत गायीला मोठे महत्व आहे. त्या आधारे सरकारने हा निर्णय घेतल्याचे समजते आहे. तसेच राज्यात देशी गायींची संख्या घटल्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली. देशी गायीचे दूध पौष्टिक असते. मानवी पोषणासाठी दूध अत्यंत महत्वाचे असते. गायीचे अनेक फायदे मानवाला होत असतात. त्या सर्व गोष्टींचा विचार करूनच राज्य सरकारने हा निर्णय घेतल्याचे म्हटले जात आहे. दरम्यान राज्य सरकारने घेतलेल्या या निर्णयाचे विश्व हिंदू परिषदेने स्वागत केले आहे. सरकारच्या या निर्णयामुळे गायींना संरक्षण मिळेल असे मत विश्व हिंदू परिषदेने मांडले आहे.

#### ३८ महत्वपूर्ण निर्णय

१. ग्राम रोजगार सेवकांना आता दरमहा ८ हजार रुपये मानधन तसेच प्रोत्साहन अनुदान
२. ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह भुयारी मार्गाच्या कामाला गती देणार. एमएमआरडीएला बिनव्याजी दुय्यम कर्ज सहाय्य देण्यास मान्यता
३. ठाणे वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या कामास गती देणार. १२ हजार २०० कोटींच्या सुधारित आराखड्यास मान्यता
४. ठाणे ते बोरिवली भुयारी मार्गासाठी १५ हजार कोटी कर्जरूपाने उभारणार
५. देशी गाईच्या पालन पोषणासाठी अनुदान योजना.
६. भारतीय खेळ प्राधिकरणाला आकुर्डी, मालाड व वाढवण येथील जागा. नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स उभारणार
७. रसायन तंत्रज्ञान संस्थेस ठाणे येथील मौजे खिडकाळीची जागा
८. राज्य जलसंपत्ती माहिती केंद्र स्थापणार. जलस्त्रोतांचे उत्तम नियोजन करणार (शेष पृष्ठ ६ वर)

## मुख्यमंत्र्यांच्या ठाण्यात भाजपची मोर्चेबांधणी सुरू; पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांचा ठाणे जिल्हा दौरा

■ ठाणे : तृप्ती गोरे

येत्या काही दिवसात विधानसभा निवडणुकांसाठी आचारसंहिता जाहीर होण्याची शक्यता व्यक्त होत असतानाच, त्यापूर्वी विविध कार्यक्रम आणि पक्षांच्या बैठकानिमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे राज्यासह ठाणे जिल्ह्यात उपस्थिती राहणार र आहे. १ ऑक्टोबरला अमित शाह यांचा दौरा निश्चित झाला आहे तर, पंतप्रधान मोदी यांच्या दौऱ्याची तारीख निश्चित झाली नसली तरी ५ ऑक्टोबरला हा दौरा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या निमित्ताने विधानसभा निवडणुकांचे बिगुल वाजण्याआधी भाजपची मोर्चेबांधणी सुरू केल्याचे चित्र आहे. काही महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत महायुतीला राज्यात फटका बसला. त्याची पुनरावृत्ती विधानसभा निवडणुकीत होऊ नये यासाठी महायुतीमधील पक्ष सतर्क झाले आहेत. विरोधकांना नामोहरम करण्यासाठी महायुतीमधील शिवसेना, भाजप आणि राष्ट्रवादी या तिन्ही पक्षाचे नेते संघटनात्मक बैठका घेत आहेत. याशिवाय, विविध प्रकल्पाचे उद्घाटन, भूमिपूजन करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र



मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत केले जात आहेत.

येत्या काही दिवसात विधानसभा निवडणुकांसाठी आचारसंहिता जाहीर होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. यामुळे आचारसंहित्यापूर्वी विविध प्रकल्प उद्घाटन, भूमिपूजन कार्यक्रम करून वातावरण निर्मिती करण्याची तयारी महायुतीकडून सुरू असून त्याचबरोबर भाजपने मतदार संघनिहाय आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित केली आहे. ही बैठक १ ऑक्टोबरला अमित शहा यांच्या उपस्थितीत सिडकोच्या वाशी येथील एक्झिबिशन सेंटर येथे होणार आहे. (शेष पृष्ठ ६ वर)

## 'आधी काहीतरी करुन दाखवा नंतर छात्या बडवा', देवेंद्र फडणवीसांचा विरोधकांना टोला

■ मुंबई : सम्यक कासारे

क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांनी आपल्याला वारसा दिला, आजचा कार्यक्रम तो वारसा पुढे नेणारा कार्यक्रम आहे. भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरु झाली. अनेक लोक त्या काळात लोक त्यांचा दुस्वास करायचे. विरोध करायचे, शेणाचे गोळे, दगड धोंडे फेकत असत. मात्र सावित्रीबाई फुले मागे हटल्या नाहीत. क्रांती सूर्य महात्मा फुले त्यांच्या मागे उभे होते. शाळा सुरु झाली त्यामुळे मुलींसाठी शिक्षणाचे दरवाजे उघडले. हा शिक्षणाचा, समाज सुधारणेचा वारसा आपल्याला मिळाला आहे. असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. पुण्यातल्या कार्यक्रमात त्यांनी हे वक्तव्य केलं. तसंच विरोधकांना त्यांनी टोला लगावला. भिडे वाडा कसा मिळवला? हे छगन भुजबळ यांनी इतिहास सांगितला. अतिशय कमी कालावधीत सुंदर प्रकारचं स्मारक पुढची १०० काय ५०० वर्षे प्रेरणा देत राहिल, हे सुरु होतं आहे म्हणून मनापासून अभिनंदन. पुणे ही समाजसुधारकांची भूमी आहे. आज वारशाचा कार्यक्रम आहे तसाच विकासाचाही आहे असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले. पुणे मेट्रोबाबत माहिती देताना देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना टोला लगावला. 'पुणे मेट्रोचं उद्घाटन पुढे गेलं, म्हणून काही लोक छाती बडवत होते. ज्यांनी एक पिलर उभारला नाही ते छाती बडवण्यात पुढे होते. काहीतरी करुन दाखवा किमान एखादा पिलर तरी उभारा मग छात्या बडवा.' अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी टीका केली. तसंच ते पुढे म्हणाले, '२०१४ मध्ये युती सरकार आल्यावर पुणे मेट्रोला गती मिळाली. पुणे मेट्रोची कामं वेगात पूर्ण झाली. पुणे मेट्रोचा टप्पा हा देशात वेगाने पूर्ण होणारा पहिला टप्पा आहे.' असंही देवेंद्र फडणवीस यांनी



म्हटलं आहे. विरोधकांना काही कामे राहिली नाहीत, त्यामुळे ते काही बोलत सुटले आहेत. पुण्यातील ही मेट्रो अंडरग्राउंड व्हावी, असे अनिल शिरोळे यांना वाटत होते. मात्र खर्च जास्त होत होता. परंतु सार्वजनिक वाहतूक व्यवस्था जोपर्यंत होत नाही तोपर्यंत वाहतूक कोंडीचा प्रश्न मिटणार नाही, हे लक्षात घेऊन आणि पुढील ५० वर्षांचा विकास लक्षात घेऊन हा प्रकल्प उभा राहिला आहे, असंही फडणवीस म्हणाले. स्वारगेट स्टेशन अर्धवट झाल्याचा आरोप होत आहे. त्यावर देवेंद्र फडणवीस यांनी खुलासा केला. ते म्हणाले, स्वारगेट स्टेशन हे मल्टीमॉडेल स्टेशन आहे. या ठिकाणी सर्व प्रकारची वाहतूक एकत्र येणार आहे.

## 'किमान देवाला तरी राजकारणापासून दूर ठेवा,' तिरुपती लाडू वादावरुन सुप्रीम कोर्टाने फटकारलं

■ तमिळनाडु : वृत्तसंस्था

आंध्र प्रदेशातील तिरुपती मंदिरामधील लाडूमध्ये प्राण्यांची चरबी मिसळल्याच्या दाव्यांमुळे वाद निर्माण झाला आहे. सुप्रीम कोर्टात याप्रकरणी सुनवाणी सुरु असून, कोर्टाने फटकारलं आहे. किमान देवाला तरी राजकारणापासून दूर ठेवा अशा शब्दांत सुप्रीम कोर्टाने ताशेरे ओढले आहेत. मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी तुपामध्ये फिश ऑईल, बीफ टॉलो आणि लार्ड (डुकराची चरबी) आढळल्याचा दावा करणारा प्रयोगशाळेचा अहवाल जारी केल्याच्या वेळेचीही



सुप्रीम कोर्टाने दखल घेतली. 'आम्ही देवाला राजकारणा पासून दूर ठेवलं जाईल अशी अपेक्षा ठेवतो. मुख्यमंत्री प्रसारमाध्यमांकडे का गेले?,' अशी विचारणा सुप्रीम कोर्टाने केली. न्यायमूर्ती भूषण आर गवई आणि न्यायमूर्ती केवी विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर सुब्रहमण्यम स्वामी यांच्या वकिलाने सांगितलं की, (शेष पृष्ठ ६ वर)

## अक्षय शिंदे याचा मृतदेह पोलिसांच्या कडेकोट बंदोबस्तात दफन

■ मुंबई : विशेष प्रतिनिधी

ठाणे : बदलापूर येथील लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा मृतदेह उल्हासनगर येथील शांतीनगर स्मशानभूमीत दफन करण्यात आला. अक्षय याला दफन करण्यास शिवसेना शिंदे गट आणि स्थानिकांनी विरोध केला होता. तसेच दफनासाठी खोदण्यात आलेला खड्डा देखील बुजविण्यात आला होता. त्यामुळे तणावाचे वातावरण



निर्माण झाले होते. पोलिसांनी बळाचा वापर करत स्थानिकांना स्मशानभूमी परिसरातून बाजूला केले. त्यानंतर त्याचा मृतदेह दफन करण्यात आला. बदलापूर येथील लैंगिक अत्याचार प्रकरणाती आरोपी अक्षय शिंदे याला ठाणे पोलिसांनी चकमकीमध्ये ठार केले होते. मुंबईतील जे.जे. रुग्णालयात त्याच्या मृतदेहाचे शवविच्छेदन झाल्यानंतर त्याचा मृतदेह कळवा येथील ठाणे महापालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील शवागृहात ठेवण्यात आला होता. त्याचा मृतदेह दफन करण्यासाठी नातेवाईक जागेचा शोध घेत होते. परंतु मृतदेह दफन करण्यास स्थानिक नागरिक आणि राजकीय पक्षांनी विरोध केला होता. त्यामुळे अक्षयचा मृतदेह दफन करण्यासाठी जागा मिळत नसल्याचा दावा करत त्याच्या वडिलांनी शुक्रवारी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मृतदेह दफन करण्यासाठी निर्जन जागा शोधण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते. त्यानुसार , मागील दोन दिवसांपासून पोलिसांकडून जागा शोधण्याची प्रक्रिया सुरू होती. परंतु स्थानिकांकडून विरोध केला जात होता. अखेर उल्हासनगर येथील शांतीनगर भागात स्मशानभूमीत अक्षयचा मृददेह दफन करण्याचे निश्चित झाले. तेथील स्मशानभूमीत मृतदेहाच्या दफनासाठी खड्डा देखील खणण्यात आला होता.

## रिपब्लिकन सेनेचे विविध मागण्यासाठी जिल्हाधिकारी यांना निवेदन

■ जालना, दिनेश आदमाने

रिपब्लिकन सेना जालना जिल्ह्याच्या वतीने माननीय जिल्हाधिकारी, जालना जिल्हा यांना गायरान जमीन कसणाऱ्यांच्या (कास्तकरी) नावे करण्यात यावी, घरकुलाच्या बजेटमध्ये वाढ करण्यात यावी, इ. विविध मागण्यासाठी निवेदन देण्यात आले. जर करण्यात आलेल्या मागण्या पूर्ण झाल्या नाही तर येत्या दहा दिवसांमध्ये रिपब्लिकन सेना भव्य मोर्चाचे नियोजन करणार असून त्याची सर्व जबाबदारी ही सरकारची राहील असे देखील मा. जिल्हाधिकारी यांना सांगण्यात आले. निवेदन देताना रिपब्लिकन



सेना मराठवाडा उपाध्यक्ष लिंबाजी वाहुळकर, जिल्हा अध्यक्ष दिनेश आदमाने, मच्छिंद्र आप्पा खरात, नवनाथ ठोके, सर्जेराव अंभोरे, सुरेश वानखडे, भीमराज खरात, अनिल भालमोडे, दादू गरबडे, पोरगा आपुट, शांताबाई हिवाळे, अर्जुन आढाव, रिपब्लिकन सेना महिला मंडळ व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## 'मराठ्यांचं आंदोलन हाताळण्याच्या भानगडीत पडाल तर...', मनोज जरांगेंचा अमित शाह यांना इशारा

■ मुंबई : नितीन देवळेकर

**राज्यात मागील काही महिन्यांपासून मराठा आरक्षणाचा प्रश्न चर्चेत आहे. मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याची मागणी मनोज जरांगे यांनी केलेली आहे. मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण मिळण्यासाठी मनोज जरांगे यांनी अनेकदा आंदोलन आणि उपोषणही केलं, तर मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्यास ओबीसींनी विरोध केला आहे. त्यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत.**

अशातच काही दिवसांपूर्वी गृहमंत्री अमित शाह महाराष्ट्र दौऱ्यावर आले होते. त्यावेळी 'आम्ही अनेक आंदोलने हाताळली, त्याप्रमाणे मराठा आंदोलनही व्यवस्थित हाताळू', असं त्यांनी म्हटलं होतं. यावरून आता मनोज जरांगे यांनी देवेंद्र फडणवीस



आणि गृहमंत्री अमित शाह यांना इशारा दिला. 'मराठ्यांना बाजुला ठेवणं ही तुमची घोडचूक असेल, मराठ्यांचं आंदोलन हाताळण्याच्या भानगडीत पडाल तर तुमचा राजकीय एन्काउंटर होईल', असा इशारा मनोज जरांगे यांनी अमित शाह यांना दिला आहे. 'एकतर ते (अमित शाह) काय उद्देशाने बोलले मला माहिती नाही. मात्र, अमित शाह शिर्डीला आले होते, तेव्हा आम्ही त्यांना म्हटलं होतं की, मराठा आरक्षणावर बोला. पण ते काहीही बोलले नाही. पण साहेब तुम्ही मराठ्यांच्या नादी लागू नका. आम्ही तुम्हाला सांगतो तुम्ही पटेल आंदोलन कसं हाताळलं? तुम्ही गुर्जर आंदोलन कसं हाताळलं? तसंच मराठ्यांचं आंदोलन हाताळणार का? आम्ही देवेंद्र फडणवीस आणि अमित शाहांना सांगतो की, मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण द्यावंच लागणार आहे. निवडणुकीच्या आधी अध्यादेश काढावा लागणार आहे', असं मनोज जरांगे यांनी म्हटलं. 'मी देवेंद्र फडणवीस यांना सांगतो की, तुम्ही मराठ्यांना सोडून राज्यात सत्ता स्थापन करू शकत नाहीत. (शेष पृष्ठ ६ वर)

महाराष्ट्र क्राईम टाइम्स






# अमेरिकी निर्बंधांचे ‘औषध’

अमेरिकेच्या लोकप्रतिनिधिगृहाचे सभापती माइक हडसन यांनी २०२४ च्या जुलै महिन्यात ‘बायोसिक्युअर’ कायद्याचा प्रस्ताव मांडण्याची घोषणा केली होती आणि तो त्याच्या पुढच्या महिन्यात लोकप्रतिनिधींच्या सभागृहात ३०६ विरुद्ध ८२ अशा मताधिक्याने मंजूर झाला. या सभागृहात सत्तारूढ पक्षाचे ४३५ पैकी फक्त २११ सदस्य आहेत, हे लक्षात घेता या मुद्द्यावर दोन्ही पक्षांची सहमती आहे असे दिसते. आता हा प्रस्ताव अमेरिकेच्या सिनेटकडे विचारार्थ जाईल. या प्रस्तावाचे कायद्यात रूपांतर झाले तर भारतीय औषधाच्या उद्योग क्षेत्रातील काही कंपन्यांसाठी व्यवसायाच्या खूप संधी उपलब्ध होतील.

अमेरिकेतील अनेक औषधकंपन्या त्यांच्या औषधांचे उत्पादन आणि संशोधनही कंत्राटी तत्त्वावर चिनी आणि इतर परदेशी कंपन्यांकडून करवून घेतात. नवीन प्रस्तावान्वये असे उत्पादन, संशोधन अमेरिकाविरोधी देशांमधील म्हणजे चीन, इराण, रशिया, क्यूबा आणि उत्तर कोरिया या देशांमधील कंपन्यांकडून करून घेण्यावर मोठ्या औषधकंपन्यांवर बंदी येईल. या देशांच्या कंपन्यांची उपकरणे किंवा सेवा वापरणाऱ्या इतर देशांच्या कंपन्यांकडूनसुद्धा अमेरिकी कंपन्यांना काम करवून घेता येणार नाही. या प्रस्तावात पाच चिनी कंपन्यांची नावे आहेत, ज्यात बीजीआय आणि ‘वुक्सि ॲपटेक’ या कंपन्यांचा समावेश आहे.

‘बीजीआय’ ही कंपनी जगातील सर्वात मोठी जनुकीय माहिती संकलित करणारी कंपनी आहे तर ‘वुक्सि ॲपटेक’ या कंपनीचा अमेरिकेत कंत्राटी पद्धतीने उत्पादित होणाऱ्या आणि वापरल्या जाणाऱ्या औषधांमध्ये एक चतुर्थांश वाटा आहे. अशा कंपन्यांबरोबर संबंधविच्छेदासाठी इसवीसन २०३२ पर्यंत वेळ दिला गेला असला तरी कायदा अस्तित्वात आला तर ही प्रक्रिया खूप वेग पकडेल. या घडामोडीचा मोठा फायदा भारतीय औषधकंपन्यांना मिळण्याची शक्यता आहे. भारतातील औषधी उत्पादन, संशोधन आणि जैवअभियांत्रिकी क्षेत्रात मोठ्या अमेरिकी गुंतवणुकीची आणि स्थानिक पातळीवर सुद्धा गुंतवणुकीची शक्यता यामुळे निर्माण झाली आहे. या प्रक्रियेला



काही वर्षे लागतील; पण गुंतवणूकदारांनी सिनजिन, पिरामल फार्मा, डिविस लॅब, न्यूलॅंड लॅबस्, सुवेन फार्मा आणि लॉरस लॅब यासारख्या कंत्रांटी औषधी उत्पादन आणि संशोधन करणाऱ्या औषधी कंपन्यांवर लक्ष ठेवावे. अरबिंदो फार्मा, ग्लॅंड फार्मा यांनी अल्केम या कंपन्यांचीही अमेरिकेत थेट गुंतवणूक आहे. या सर्व कंपन्यांचा साकल्याने अभ्यास हा एक स्वतंत्र विषय आहे; पण कंपनीच्या व्यवसायात या भागांचा हिस्सा, कंपनीचे आर्थिक आकडे आणि मुख्यतः मूल्यांकन या सर्व बाबींचा सखोल अभ्यास गुंतवणुकीसाठी अत्यावश्यक आहेच. या आणि अशा सर्व कंपन्यांच्या वर्तमान आणि आगामी भांडवली गुंतवणुकीकडेही लक्ष असू द्यावे, याचे कारण व्यवसायवृद्धीची खात्री असल्याशिवाय उद्योजक भांडवली गुंतवणूक करत नाहीत. शेअर बाजार नेहमीच भविष्यात बघणारा (फॉरवर्ड लुकिंग) असल्याने अमेरिकेत असा कायदा झाला तर अशा भारतीय औषधी कंपन्यांच्या समभागांचे भाव तत्काळ वाढतील. कंत्राटी संशोधन आणि उत्पादनाची जागतिक मागणी २०० अब्ज डॉलरची आहे आणि येत्या पाच वर्षांमध्ये यात प्रतिवर्ष १३ टक्के वाढ अपेक्षित आहे. उद्योग सूत्रांनुसार भारताचा यात सध्याचा वाटा सुमारे तीन टक्के आणि चीनचा नऊ टक्के आहे. म्हणजे भारतीय कंपन्यांसाठी व्यवसायवृद्धीला भरपूर वाव आहे; पण अंतर्गत स्पर्धाही पुष्कळ आहे.

हा कायदा आणि यामागील उद्देश एका दूरगामी परिणामाचा दिशादर्शक आहे. अमेरिकी तंत्रज्ञानाची चोरी आणि या तंत्रज्ञानाचा अमेरिकेविरुद्ध वापर होण्यात मुळातूनच प्रतिबंध घालणे, हा या कायद्याचा मूळ उद्देश आहे. गेली अनेक वर्षे व्यापाराच्या जागतिकीकरणाचा आणि खुल्या, भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा पुरस्कर्ता असलेला अमेरिकेसारखा प्रगत देश हे एक पाऊल संपूर्ण विरुद्ध दिशेला उचलत आहे. यासाठी बदलती जागतिक राजकीय परिस्थिती आणि बदलती समीकरणे कारणीभूत आहेत. वर्तमान कायदा जरी औषधी उद्योगाशी संबंधित असला तरी भविष्यात ‘कृत्रिम प्रज्ञा’ यासारख्या प्रगत तंत्रज्ञान क्षेत्रांसाठी असा कायदा येण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारतीय आयटी कंपन्यांचा मोठा व्यवसाय अमेरिकेत आहे. कित्येक मोठ्या अमेरिकी आयटी कंपन्यांचे प्रमुख भारतीय वंशाचे आहेत. ‘ॲपल’सारखी कंपनी आता भारतात उत्पादन करते आहे आणि जाबिल कंपनीसारखे ॲपलचे काही सुट्या भागांचे पुरवठादार आता भारतात उत्पादन सुरू करण्याच्या विचारात आहेत. हे सर्व घटक अमेरिकी उद्योगांना भारताकडे वळण्यासाठी अनुकूल आहेत. या कायद्यात चीनबरोबर इतर देशांचीही नावे असली तरी मुख्य लक्ष्य चीनच आहे यात शंका नाही. अमेरिकेच्या विश्वप्रभुत्वाच्या स्थानाला चीन हे एक मोठे आव्हान आहे आणि एका म्यानात दोन तलवारी कधीच नांदत नाहीत. भारताची परिपक्व लोकशाही, वाढती आणि खुणावणारी मोठी बाजारपेठ आणि स्वस्त आणि उच्चशिक्षित मनुष्यबळ या बाबी अमेरिकन व्यवसाय भारताकडे वळवण्यासाठी अनुकूल आहेत. भारताची सरकारी आर्थिक धोरणे अधिकाधिक व्यवसायानुकूल होत आहेत. म्हणून औषधी आणि आयटी क्षेत्रात तरी यापुढे भारतीय कंपन्यांना व्यवसायवृद्धीसाठी जास्त संधी उपलब्ध होतील. सीमेवर चीन सतत काढत असलेल्या कुरापतींमुळे भारत आणि अमेरिकेत जास्त जवळीक निर्माण झाली आहे आणि हे एका तऱ्हेने भारताच्या पथ्यावरच पडले आहे. हा प्रस्ताव अमेरिकेच्या सिनेटमध्ये संमत होईल, असे वाटते; पण त्यांचे कायद्यात रूपांतर होण्यासाठी अमेरिकेच्या अध्यक्षांची मंजुरी आवश्यक आहे. अमेरिकेतील निवडणुकीकडे सर्व जगाचे लक्ष नेहमीच लागलेले असते, याचे कारण अमेरिकेच्या आर्थिक धोरणांचा जागतिक अर्थव्यवस्थेवर लक्षणीय प्रभाव पडतो. येत्या नोव्हेंबर महिन्यात होणार असलेल्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचे डोनाल्ड ट्रम्प आणि डेमोक्रॅटिक पक्षाच्या आणि विद्यमान उपाध्यक्षा कमला हॅरिस हे समोरासमोर उभे आहेत.

# सैन्य, विश्वास आणि लोकशाही

**इस्लाम आणि बौद्ध धर्म असूनही इंडोनेशिया, मलेशिया, तुर्कस्तान आणि श्रीलंकेत घटनात्मक, लोकशाही आणि स्थिरता नांदते परंतु, पाकिस्तान, बांगलादेश आणि म्यानमारमध्ये नाही? कोणताही धर्म मूलतः लोकशाहीचा शत्रू नाही. मात्र, जेव्हा राष्ट्रीय विचारसरणीच्या केंद्रस्थानी धर्माला आणि शक्तीच्या केंद्रस्थानी सैन्याला ठेवता तेव्हा समस्या उद्‌भवतात. तुम्ही उत्तरासाठी गुगलची मदत न घेण्याचे आश्वासन दिल्यास मी तुम्हाला एक प्रश्न विचारेन. तर कृपया मला सांगा, बांगलादेशातील सत्ताबदलाच्या संदर्भात तुम्ही ऐकलेले शांततेचे नोबेल पारितोषिक विजेते मोहम्मद युनूस याशिवाय दुसरे कोणते नाव होते? संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेपासून ते युरोपियन युनियनपर्यंतच्या सर्व पाश्चात्त्य उदारमतवादी नेत्यांनी त्यांना ‘सिंहासना’वर बसविले .**

आता दुसरा प्रश्न. आपल्या दोन्ही मोठ्या उपखंडीय शेजाऱ्यांमध्ये लोकशाही इतकी नाजूक का आहे? याचे उत्तर इस्लाम आणि लोकशाही एकत्र नांदू शकत नाही, असे चटकन येईल. वर्तमानाचा ‘मूड’ बघता पाहता हे उत्तर योग्य वाटत असले तरीही ते सोप्या तथ्य तपासणीच्या कसोटीवर खरे उतरत नाही. सुदूर पूर्वेकडे बघितले तर जगातील सर्वाधिक मुस्लिम लोकसंख्या असलेल्या इंडोनेशियामध्ये हा रूढीबद्ध विचार अयशस्वी झाल्याचे दिसतो. मलेशियामध्ये शांततापूर्ण निवडणुकीच्या मार्गाने तेथे स्थित्यंतर होऊन महाथीर मोहम्मद निवडून आले. इकडे पश्चिमेस तुर्कीयेकडे जा. रेसेप तय्यप एर्दोगान हे काही उदारमतवादी लोकशाहीवादी नाहीत.

फार तर ते महाथीर यांच्यापेक्षा थोडे उजवे असू शकतात. पण त्यांनाही निवडणुकांना सामोरे जावे लागते आणि लोकशाही परिपूर्ण असते हे कुणीही मान्य करू शकत नाही. इंडोनेशिया आणि तुर्कीये हे लोकसंख्येच्या बाबतीत पाकिस्तान किंवा बांगलादेश इतकेच इस्लामिक आहेत. त्यामुळे इस्लाम लोकशाहीशी सुसंगत नसल्यामुळेच पाकिस्तान आणि बांगलादेशात सतत गडबड होत राहते, हा विचार तथ्याच्या कसोटीवर पराभूत होतो.

मी आता तुम्हाला पुढच्या एका देशात घेऊन जातो. हा देश म्हणजे म्यानमार. तिथे इस्लाम नाही. जर काही असेल तर, त्यांनी त्यांच्या बहुतेक मुस्लिम, रोहिंग्यांचा छळ करून त्यांना हकलून दिले. हा जवळजवळ संपूर्ण बौद्ध देश आहे.

येथे बहुतांश वेळा हुकूमशहाच प्रभावी राहिले आहेत. तेथे फेब्रुवारी २०२१ मध्ये शांततेच्या नोबेल पारितोषिक विजेत्या आंग सान स्यू की यांना तुरुंगात टाकले. आता म्यानमारमधून लोकशाही हद्दपार होण्यासाठी इस्लामला दोष देता येत नाही. या अराजकतेसाठी काय बौद्ध धर्माला दोष द्याल? आपल्या शेजारी नजर ठेवून आपण हे देखील पडताळून पाहू शकतो. श्रीलंका हा देश प्रामुख्याने बौद्ध धर्मीय आहे. तेथील बौद्ध भिक्खू हिंसक, वर्णद्वेषी



आणि अभावानेच उदारमतवादी आहेत. ‘जेव्हीपी’च्या (जनता विमुक्ती पेरामुना) मूळ दहशतवादी अवताराच्या काळात श्रीलंकेत जे घडले त्याकडे दुर्लक्ष केले जाऊ शकत नाही. या पक्षाचा नेता त्याच्या नवीन नावाने सत्तेत निवडून आला आहे. त्या हिंसक काळात बौद्ध भिक्खूंनी केवळ सांप्रदायिक हत्यांना प्रोत्साहन दिले होते. यामुळे ‘बौद्ध धर्म लोकशाहीसाठी चांगला तर इस्लाम वाईट’ ही कल्पना पोकळ ठरते. लोकशाहीला शह देण्यासाठी इस्लाम किंवा इतर कोणत्याही श्रद्धेपेक्षा अधिक काहीतरी आवश्यक आहे. या टप्प्यावर, मला पहिल्या प्रश्नाचे उत्तर द्यायचे आहे. बांगलादेशातील बदलानंतर युनूस यांच्या व्यतिरिक्त तुम्ही कोणते नाव ऐकले होते? हे नाव होते जनरल वकेर-उझ-झमान यांचे. हसीना यांनी पदच्युतीच्या काही आठवडेच आधी २३ जून रोजी लष्करप्रमुख म्हणून त्यांना नियुक्त केले होते. त्यांनी या आठवड्याच्या सुरुवातीला ‘रॉयटर्स’शी बोलताना जे सांगितले ते युनूस यांनी कधीच सांगितले नाही.

झमान म्हणाले की, पुढील निवडणुकीची कालमर्यादा आणि त्यासाठीचे हे प्रभारी प्रशासन अंतरिम स्वरूपाचे आहे. या प्रशासनाचा कार्यकाळ १२ ते १८ महिन्यांचा आहे असे त्यांनी स्पष्ट केले आहे. ही व्यवस्था निवडून सत्तेवर न आलेली आणि राज्यघटनेशिवाय राज्य करत आहे आणि प्रभारी व्यक्ती कार्यकारी किंवा राजकीय पदावर नाही. युनूस हे मुख्य सल्लागार आहेत. अलीकडे आपण असे कधीही ऐकलेले नाही की, १७ कोटींहून अधिक लोकसंख्येच्या प्रजासत्ताकाचा कारभार मुख्य सल्लागार चालवतात. १९९९ मध्ये नवाझ शरीफ यांना पदच्युत केल्यानंतर जनरल परवेझ मुशर्रफ यांनी असा ‘स्टंट’ केला.

स्वत:ला अध्यक्ष म्हणवून घेण्यासाठी अत्यंत लाजिरवाण्या पद्धतीने त्यांनी स्वत:ला मुख्य कार्यकारीपदी निवडले. पुढे आग्रा शिखर परिषदेच्या निमित्ताने (जुलै, २००१) स्वत:ला अध्यक्ष म्हणून नियुक्त केले. भारताच्या पंतप्रधानांशी चर्चा करताना केवळ मुख्य कार्यकारी अधिकारी पाकिस्तानचे प्रतिनिधित्व कसे करू शकणार होते?

यातून मला असे सुचवायचे नाही की, युनूस हेही त्याचप्रमाणे आपले पद बदलतील वा जनरल झमान हा पदभार स्वीकारतील. सेनापतींना सत्ता ताब्यात घेणे आताशा खूपच अवघड झाले आहे. पाकिस्तान आणि बांगलादेशमध्ये त्यांनी पडद्यामागे राहून नेतृत्व कसे करायचे हे दाखवून दिले आहे. या टप्प्यावर आपण जिथे सुरुवात केली तेथे परत जाऊया. इंडोनेशिया, मलेशिया, तुर्कीये आणि श्रीलंका अनुक्रमे इस्लाम आणि बौद्ध धर्म असूनही घटनात्मक, लोकशाहीवादी आणि स्थिर राहतात परंतु, पाकिस्तान, बांगलादेश आणि म्यानमारला ते का साध्य होऊ शकत नाही? जर सैन्याकडे सन्मानासाठी पात्रता अशी एकमेव संस्था म्हणून बघितले गेले आणि धर्माने त्याला मान्यता दिली तरच पाकिस्तान, बांगलादेश आणि म्यानमारमध्ये जे घडले ते सुसंगत ठरते. जर सैन्याने बाजूला राहून आपली मौन बाळगले नसते तर ढाकामध्ये हा बदल शक्य झाला नसता. सैन्य होकार देत नाही तोपर्यंत राज्यघटनेद्वारे नवीन लोकशाही व्यवस्था निर्माण होऊ शकत नाही. या महिन्याच्या सुरुवातीला, बांगलादेशने मोहम्मद अली जिना यांच्या जयंतीचा दुर्मिळ स्मरणोत्सव पाहिला. ढाका येथील नॅशनल प्रेस क्लब येथे आयोजित कार्यक्रमाला पाकिस्तानचे उपउच्चायुक्त उपस्थित होते. त्यांनी आणि अन्य वक्त्यांनी जिना यांचा उदोउदो करणे का गरजेचे आहे, हे सांगितले. जिना यांनी द्विराष्ट्राचा सिद्धांत मांडून पाकिस्तानची निर्मिती केली नसती तर बांगलादेशचा उदय कसा झाला असता? असे मत या वक्त्यांनी व्यक्त केल्याचे वृत्त प्रकाशित झाले आहे. मागील दशकांत असा युक्तिवाद केला जात होता की, पूर्व पाकिस्तानमधील बंगालींनी वेगळे होऊन जिनांच्या द्विराष्ट्र सिद्धांताला सुरुंग लावला.

तिथे आता जिना यांच्या सुधारणावादी मतांची पुनर्स्थापना केली जात आहे. ते टिकेल किंवा टिकणारही नाही. पण मोठा मुद्दा निश्चितच अबाधित राहणार. जर राष्ट्रीय विचारसरणीत धर्मच केंद्रस्थानी असेल आणि सैन्याकडे सीमांचे रक्षण करणारी एकमेव संस्था म्हणून पाहिले जात असेल, तर कोणतीही राज्यघटना राष्ट्रनिर्मिती किंवा राज्यकारभारासाठी दुय्यम ठरते. म्यानमारमध्ये भिक्खूंनी लष्करी अत्याचाराचे समर्थन केल्याचे आपल्याला दिसते.

या प्रकारामुळे लोकशाहीला मोठा धोका निर्माण झाला आहे आणि आपल्या तीन शेजाऱ्यांचा अंतर्गत संघर्ष अधोरेखित झाला आहे. त्यात ५३ वर्षे बांगलादेशने अनेक घटनात्मक व्यवस्था पाहिल्या आहेत तर लष्कर प्रमुखांनी पाकिस्तानचे औपचारिकपणे नेतृत्व केल्याचे दिसून येते. सर्व सरकारे मग लष्करी असोत की निवडून आलेले,

त्यांनी राज्यघटनेशी खेळ केला आहे. बांगलादेशमध्ये रस्त्यावर लढणाऱ्या जनतेने अनौपचारिकपणे निवडलेली प्रशासकीय व्यवस्था आणखी एक राज्यघटना आणण्याच्या तयारीत आहे. सर्व लोकशाहींना आव्हानात्मक काळाचा सामना करावा लागला आहे. आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधींनी राज्यघटनेचे पुनर्लेखन केले होते. पण जेव्हा त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांनी हे विषाक्त बदल रद्द केले आणि पक्ष या बदलासोबत राहिला. यातून उरलेल्या काही गोष्टींमध्ये विषाचा अंशही शिल्लक नाही. आज भारताच्या राज्यघटनेचे प्रास्ताविक देशाला समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष असे संबोधते त्याकडे पुरोगामी म्हणून बघितले जाते. कारण कोणतीही धार्मिक शक्ती लोकशाहीची मूल्ये ध्वस्त करणाऱ्या प्रयत्नांना पवित्र ठरवत नाहीत आणि कोणतेही सैन्य अशा प्रयत्नांना पाठिंबा देत लोकशाही पुनर्स्थापित करण्याचे वचन देत नाही.


म्हणूनच माझ्या पुढील म्हणण्याला तुम्ही दुजोरा देऊ शकता. कोणताही धर्म मूलतः लोकशाहीचा शत्रू नाही. मात्र, जेव्हा राष्ट्रीय विचारसरणीच्या केंद्रस्थानी धर्माला आणि शक्तीच्या केंद्रस्थानी सैन्याला ठेवता तेव्हा समस्या उद्‌भवतात.

# भाषिक अल्पसंख्याकांना संरक्षण

घटनाकारांनी कोणत्याही एकाच धर्माचे देशात अवडंबर माजू नये म्हणून केलेल्या तरतुदी आपण मागील लेखात पहिल्या. या लेखात आपण घटनाकारांनी धार्मिक व भाषिक अल्पसंख्यांक यांना दिलेल्या विशेष संरक्षण देणाऱ्या तरतुदी पाहणार आहोत. राज्यघटनेचे कलम २९ (१) स्पष्टपणे सांगते की, देशातील कोणत्याही समुहाला त्यांची स्वतंत्र भाषा, लिपी अथवा संस्कृती असल्यास त्याचे जतन व संवर्धन करण्याचा अधिकार असेल. भारतीय राज्यघटनेत कुठेही ‘अल्पसंख्यांक’ या शब्दाची व्याख्या केलेली नाही, अथवा घटनाकारांनी कोणत्याही समूहाला घटनेत ‘अल्पसंख्यांक’ म्हणून जाहीर देखील केलेले नाही. अल्पसंख्यांक समूहाची पूर्वअट इतकीच आहे की, या समूहाची स्वतंत्र भाषा,लिपी असावी अथवा स्वतंत्र संस्कृती असावी. घटनेच्या कलम २९ (१) चा विचार करत असताना अशी कोणतीही कृती जी कोणत्याही समुहाच्या स्वतंत्र अशा लिपी, संस्कृती व भाषेला धोक्यात आणू पाहते, ती कृती घटनाविरोधी ठरते. कलम २९चा पहिला भाग हा केवळ अल्पसंख्यांक समूहासाठी मर्यादित असून दुसरा भाग मात्र देशातील सर्वच नागरिकांसाठी खुला आहे. कलम २९ च्या दुसऱ्या उपकलमात असे नमूद आहे की, देशातील सरकारद्वारे चालवल्या जाणाऱ्या अथवा सरकारची मदत मिळणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक समूहात कुठल्याही नागरिकाला केवळ धर्म, वंश, जात, भाषा अथवा यापैकी कोणत्याही कारणास्तव प्रवेश नाकारला जाणार नाही.

यामध्ये महत्त्वाची बाब अशी की, हे जरी खरे असले की केवळ धर्म, वंश, जात, भाषा या आधारावर कोणालाही प्रवेश नाकारला जाऊ शकत नाही तरी या चार बाबी वगळून इतर बाबींच्या आधारे प्रवेश नाकारला जाऊ शकतो.

उदाहरणार्थ शैक्षणिक गुणवत्ता, प्रवेशासाठी किमान गुणांची अट इत्यादी. ‘प्रदीप टंडन विरुद्ध उत्तर प्रदेश




सरकार’ या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने असेही नमूद केले की, केवळ एका विशिष्ट भाषेत प्रवेशपरीक्षा घेतली म्हणजे भाषेच्या आधारावर प्रवेश नाकारला, असे म्हणता येणार नाही. कलम २९ (२) चे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ज्याप्रमाणे इतर मूलभूत हक्कांच्या उल्लंघनासाठी फक्त सरकारविरोधात दाद मागता येते, तसे या कलमाच्या बाबतीत नसून कोणत्याही शैक्षणिक संस्थेने ज्यांना कोणत्याही प्रकारचे सरकारी ‘सहाय्य’ मिळाले आहे, त्यांच्या विरोधातही या कलमाच्या उल्लंघनाबद्दल दाद मागता येते. राज्यघटनेचे कलम ३० हे धार्मिक अथवा भाषिक अल्पसंख्यांक समूहाला त्यांच्या पसंतीप्रमाणे शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचे व चालवण्याचे स्वातंत्र्य देते. तसेच अशा प्रकारच्या शैक्षणिक संस्था स्थापन झाल्यावर या संस्थांच्याबरोबर या संस्था केवळ अल्पसंख्यांक समूहाद्वारे चालवल्या जाणाऱ्या संस्था आहेत, म्हणून कोणताही भेदभाव केला जाऊ नये, असेही संरक्षण भारतीय राज्यघटनेने दिले आहे. घटनाकारांनी समाविष्ट केलेल्या या कलमाचा नक्की उद्देश काय असावा यावर अनेक मतमतांतरे आहेत. मात्र प्रामुख्याने देशातील धार्मिक अथवा भाषिक अल्पसंख्यांक समूहाला व्यवस्थेच्या अथवा बहुसंख्यांक समूहाच्या कोणत्याही दबावाला बळी न पडता स्वतःची भाषा, लिपी व संस्कृती जतन करण्यासाठी संरक्षण मिळावे, हा या तरतुदींच्या मागील विचार असण्याची दाट शक्यता आहे.

एका खटल्यात सर्वोच्च न्यायालय असे म्हणते की ‘‘या तरतुदींचा अर्थ असा घेतला जाऊ नये की अल्पसंख्यांक समूहाला बहुसंख्यांक समाजापेक्षा अधिक अधिकार आहेत, केवळ असे म्हणता येईल की अल्पसंख्यांक समूहाला या विशिष्ट बाबतीत बहुसंख्यांक समाजापेक्षा अधिक संरक्षण आहे.’’ सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्णयांचे अनुमान काढले असता, अल्पसंख्यांक असण्यासाठी केवळ भाषिक अथवा धार्मिक अल्पसंख्यांक असणे, इतकेच पुरेसे आहे, यापलीकडे अल्पसंख्यांक असण्यासाठी इतर कोणतीही अट घटनेत समाविष्ट नाही.

**महाराष्ट्र शासन**
इलाखा शहर विभाग, (सा.बां.)
**ई -निविदा सूचना क्र. २४ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई (दुरध्वनी क्रमांक-२२०१६९७५ /२२०१६९७७) हे सक्षम व अनुभवी कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-२ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्याकरीता इचगाम, जि. बडगाम, जम्मू काश्मीर येथे महाराष्ट्र भवन बांधकाम करणे. (स्थापत्य व विद्युत कामे सह) | ५७६१.२७ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी- दि. २०.९.२०२४ ते दि. ४.१०.२०२४ पर्यंत.

निविदा पूर्व बैठक - दि. २५.९.२०२४ (बैठकिचे ठिकाण मुख्य अभियंता यांचे कार्यालय ४ बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ वेळ : ३.०० वाजता)

ई-निविदा उघडणे- दि. ७.१०.२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता
निविदा सूचने मध्ये काही बदल/सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिध्द केले जाईल.
खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.com
2) http :// mahatenders.gov.in

जा.क्र. इशवि/निलि/३३०९४
कार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
२ रा मजला,बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.
Email : presidency.ee@mahapwd.gov.in
दिनांक : ३१/९/२०२४

(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/३३०७

महाराष्ट्र शासन, गृह विभाग (बंदरे व परिवहन)
**महाराष्ट्र सागरी मंडळ**
इंडियन मर्कंटाईल चेंबर्स, दुसरा मजला, १४ रामजीभाई कमानी मार्ग, बलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१.
Website : https://mahammb.maharashtra.gov.in
Email: ceo.mmb@maharashtra.gov.in / ceommb@gmail.com

ई - निविदा सूचना (सन २०२४-२५)

Main Portal : https://mahatenders.gov.in
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई यांचे मार्फत योग्य अनुभव असलेल्या ठेकेदाराकडून खाली नमूद केलेल्या कामांसाठी बी-२ नमुन्यात ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाच्या निविदेची अंदाजित किंमत (रु.) | इसारा रक्कम (रु.) | कोऱ्या निविदेची किंमत (रु.) | काम पूर्ण करण्याचा कालावधी(महिन्यात) |
|---|---|---|---|---|---|
| १ | गीतानगर, कुलाबा मुंबई येथील संरक्षण भिंतीची दुरूस्ती करणे | २३,५०२,६,९११/- | ११,७५,५००/- | ३,५४०/- | १८ महिने (पावसाळा कालावधी धरून ) |

तपशिलवार अटी व शर्ती पाहण्यासाठी तसेच कोरा निविदा फॉर्म डाऊनलोड करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा पोर्टल https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर **दिनांक २५.०९.२०२४* रोजी ११:००* ते दिनांक ०४.१०.२०२४* रोजी १७:००*** पर्यंत उपलब्ध होतील.
कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांचेकडे राखून ठेवण्यात आला आहे.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/३२९०

सही/-
(श्री. एस.आर.बांगर)
अधिक्षक अभियंता,
महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई.

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4 , Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate , Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**
• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com , Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# ‘महाराष्ट्रात या दिवशी मतदान होईल’, शरद पवारांनी व्यक्त केला अंदाज; आचारसंहिता व अर्ज प्रक्रियेबाबत म्हणाले...

■ **मुंबई : विशाल कारंडे**

महाराष्ट्र, हरियाणा, झारखंड व जम्मू काश्मीर राज्यांच्या विधानसभा निवडणूक एकत्र घेतल्या जातील अशी अपेक्षा व्यक्त केली जात असतानाच निवडणूक आयोगाने वेगळा निर्णय घेतला. आयोगाने आधी हरियाणा व जम्मू काश्मीरची निवडणूक घेतली आणि आता ते महाराष्ट्र व झारखंडची निवडणूक घेणार आहेत. पुढच्या आठवड्यात जम्मू-काश्मीर व हरियाणा विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर केला जाणार आहे. त्यानंतर निवडणूक आयोग आपला मोर्चा महाराष्ट्र व झारखंडकडे वळवणार आहेत. ‘महाराष्ट्र विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबरला संपत असून त्यापूर्वी निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईल’, असं मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी शनिवारी पत्रकार परिषदेद्वारे जाहीर केलं.

राजीव कुमार, निवडणूक आयुक्त ग्यानेश कुमार आणि सुखविंदरसिंग संधू यांनी दोन दिवसात राजकीय पक्ष, मुख्य सचिव आणि पोलिस महासंचालक, विभागीय




आयुक्त, महापालिका आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक आणि निवडणूक अधिकारी यांच्या बैठका घेऊन विधानसभा निवडणूक तयारीचा आढावा घेतला. येत्या काही दिवसांत निवडणूक आयोग राज्याच्या निवडणुका जाहीर करेल. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख व ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी विधानसभेच्या निवडणुकीबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. पवार म्हणाले, ‘माझा स्वतःचा असा अंदाज आहे की साधारणतः ६ ते १० ऑक्टोबरदरम्यान निवडणूक आयोग पत्रकार परिषद घेऊन महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर करेल. त्यानंतर काही दिवसांनी आचारसंहिता लागू केली जाईल. आचारसंहितेची तारीखही त्याच दिवशी जाहीर केली जाईल. निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्यानंतर साधारण आठवडाभराने उमेदवारी अर्ज दाखल करून घेण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल. त्यानंतर १५ ते २० नोव्हेंबर दरम्यान महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे मतदान पार पडेल, अशी शक्यता आहे’. मतदान दिवाळी, देवदिवाळी, छटपूजा काळात आणि आठवड्याच्या शेवटी न घेता मंगळवार, बुधवार, गुरुवारी घ्यावे, अशी मागणी राजकीय पक्षांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे. ही मागणी योग्यच असून त्यावर विचार होईल. असं निवडणूक आयोगाने म्हटलं आहे. निवडणूक एकाच टप्प्यात घेण्याची मागणी काही राजकीय पक्षांनी केली असल्याच्या वृत्ताला आयोगाने दुजोरा दिला, मात्र त्यावर कोणतेही मत व्यक्त केले नाही.

# राज ठाकरेंची लाडकी बहीण योजनेवर अप्रत्यक्षरित्या टीका; प्रफुल्ल पटेल म्हणाले, ‘ज्या लोकांना सरकारची...

■ **मुंबई : प्रथमेश चव्हाण**

शनिवारी अमरावतीत पत्रकारांशी अनौपचारिक गप्पा मारताना राज ठाकरे यांनी लाडकी बहीण योजनेवर अप्रत्यक्षरित्या टीका केली होती. जानेवारीत पगार द्यायला सरकारच्या तिजोरीत पैसे राहणार नाहीत, असं ते म्हणाले होते. तसेच राज्य खड्डयात घातलं जात असेल तर ते चुकीचं आहे. महिलांना अशा प्रकारे पैसे न देता राज्यात नवीन उद्योग आणा, अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली होती. दरम्यान, राज ठाकरे यांच्या टीकेनंतर आता विविध राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. अजित पवार गटाचे नेते तथा खासदार प्रफुल्ल पटेल यांनीही राज ठाकरेंच्या टीकेला प्रत्युत्तर दिलं आहे.

प्रफुल्ल पटेल यांनी आज गोंदिया येथे माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी विविध विषयांवर त्यांची भूमिका स्पष्ट केली. यादरम्यान त्यांना राज ठाकरेंच्या टीकेबाबतही विचारण्यात आलं, यासंदर्भात बोलताना, ज्या लोकांना विधानसभेची आणि सरकारची माहिती नाही, त्यांनी अशा प्रकारचे वक्तव्य करणे बरोबर आहे का? अशी प्रतिक्रिया त्यांनी





दिली. ‘लाडकी बहीण योजना असो, गॅस सिलिंडर मोफत देण्याचा निर्णय असो किंवा मुलींना मोफत शिक्षणाचा निर्णय असो, या आणि इतर अशा अनेक कल्याणकारी योजनांसाठी राज्य सरकारने निधीची तरतूद केली आहे. अजित पवार यांच्या सारखा संयमी अर्थमंत्री आपल्या राज्याला लाभला आहे. त्यांना पैसा कसा वाचवायचा याची माहिती आहे. त्यामुळे एकदा अर्थसंकल्पात घोषणा झाल्यानंतर त्याबाबत शंका उपस्थित करणं योग्य नाही. पुढची पाच वर्ष सुद्धा या योजना चालणार आहेत. इतक नाही, तर या योजनांतर्गत दिले जाणारे अर्थसहाय्यदेखील वाढणार आहे. त्यामुळे ज्या लोकांना विधानसभेची आणि सरकारची माहिती नाही, त्यांनी अशा प्रकारचे वक्तव्य करणे बरोबर नाही’, असं प्रफुल्ल पटेल म्हणाले. पुढे बोलताना त्यांनी महायुतीच्या जागावाटपावरही भाष्य केलं. ‘महायुतीचे जागावाटप जवळपास निश्चित झालेले आहे. येणाऱ्या चार-पाच दिवसांमध्ये जागा वाटपाबाबतचा योग्य तो निर्णय घेण्यात येईल. तिन्ही पक्ष मिळून याबाबत सकारात्मक आहेत. ज्या ठिकाणी ज्या पक्षाचे आमदार निवडून आले आहेत, त्यासंबंधी सुद्धा विचार करण्यात आला आहे. जिथे जागांची अदलाबदल आवश्यक आहे, तिथे ती करण्यात येईल. तसेच कोण किती जागा लढणार? हा निर्णय सुद्धा लवकर घेण्यात येईल’, अशी प्रतिक्रिया प्रफुल पटेल यांनी दिली. दरम्यान, आगामी विधानसभा निवडणुकीत अजित पवार गटाला १० ते १२ जागा मिळतील असं सर्वे सांगतो, असे रोहित पवार म्हणाले होते. याबाबत विचारलं असता, ‘रोहित पवारांनी म्हटलं म्हणजे सर्वे का? त्यांच्याबद्दल मी जास्त बोलू इच्छित नाही.

# ‘नवे महाबळेश्वर’ला पर्यावरणतज्ज्ञांचा विरोध

■ **मुंबई : राकेश गायकवाड**

**‘नवे महाबळेश्वर’ हा राज्य सरकारचा प्रकल्प केंद्र शासनाच्या पश्चिम घाटातील पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील गावांबाबत अधिसूचनेचे उल्लंघन करणारा असून तो रद्द करण्यात यावा, अशी मागणी राज्यातील पर्यावरणतज्ज्ञांनी केली आहे. अधिसूचनेत समावेश असलेल्यांपैकी एकाही गावाचे नाव वगळले जाऊ नये, अशी सूचनाही करण्यात आली आहे.**

केरळमधील वायनाडच्या भूस्खलन दुर्घटनेनंतर केंद्र सरकारने पश्चिम घाटातील काही क्षेत्र पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील जाहीर करण्याबाबतची मसुदा अधिसूचना ३१ जुलै रोजी प्रसिद्ध केली. त्या अधिसूचनेवर सूचना आणि आक्षेप नोंदवण्यासाठी ३० सप्टेंबरपर्यंत



मुदत देण्यात आली आहे. त्यावर संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रमाचे माजी संचालक डॉ राजेंद्र शेंडे, वनस्पती वर्गीकरणशास्त्रज्ञ डॉ. मधुकर बाचुळकर, निसर्ग आणि पर्यावरण संवर्धन संस्थेचे डॉ. संदीप श्रोत्री, ट्रॉपिकल इकोलॉजी आणि इव्होल्यूशन लॅबमधील (भोपाळ) डॉ. साकेत श्रोत्री, कास पठार संवर्धनासाठी कार्यरत असणारे सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ जाधव यांनी हरकती आणि सूचना पाठवल्या आहेत. यामध्ये नवे महाबळेश्वर प्रकल्प रद्द करण्याची सूचना देण्यात आली आहे. हा प्रकल्प केंद्राच्या संवेदनशील क्षेत्र अधिसूचनेचे उल्लंघन करणारा असल्याचे मत या तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. राज्यातील २,१२७ गावे पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील जाहीर करण्यात आली आहेत. त्यातील एकही गाव यादीतून वगळण्यात येऊ नये, अशी सूचनाही देण्यात आली आहे. या अधिसूचनेचे पालन आणि अंमलबजावणी करण्याची जबाबदारी राज्य सरकारची असेल. ही प्रक्रिया करताना राज्य सरकारने संवेदनशील क्षेत्रातील स्थानिक समुदायांसोबत चर्चा करून निर्णय घेणे अपेक्षित आहे. त्यासाठी केंद्र सरकारने सर्व सहा राज्यांना मदत देणे आणि देखरेख करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे, अशी अपेक्षाही तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,
आरे गोरेगाव,(पूर्व),मुंबई -४०००६५.
निविदा सूचना क्रमांक ०८ सन २०२४ -२०२५

कार्यकारी अभियंता, सा.बा. विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई - ४०० ०६५. (दुरध्वनी क्रं. ०२२-२९२७२४४७) हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत वर्ग-९ व वरील वर्गाचे कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता ब - १ (ऑफलाईन) निविदा प्रणालीद्वारे देकार मागवित आहेत. कार्यकारी अभियंता, सा. बां. विशेष प्रकल्प विभाग आरे, गोरेगांव (पुर्व) मुंबई-४०००६५ हे भरुन पाठविलेल्या सिलबंद निविदा तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कोणतेही कारण न देता सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्रं | कामाचे नांव | रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| १. | जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र शेलार, ता.भिवंडी जि.ठाणे येथे प्रयोगशाळा इतारतीच्या मागील बाजूस गटार बांधणे. | Rs.234669.00 |
| २. | जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र शेलार, ता.भिवंडी जि.ठाणे येथे कर्मचारी निवासस्थानाचे दुरुस्ती करणे. | Rs.231099.00 |
| ३. | जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र शेलार, ता.भिवंडी जि.ठाणे येथे छताचे व आभासी छताचे काम करणे. | Rs.233904.00 |
| ४. | जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र शेलार, ता.भिवंडी जि.ठाणे येथे प्रयोगशाळा इतारतीच्या पुढील आणि मागील बाजू विकसित करणे. | Rs.237556.00 |
| ५. | जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र शेलार, ता.भिवंडी जि.ठाणे येथील कुंपण भिंतीची दुरुस्ती करणे. | Rs.171510.00 |
| ६. | जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र शेलार, ता.भिवंडी जि.ठाणे या कार्यालयीन इमारतीची अंतर्गत दुरुस्ती करणे. | Rs.185604.00 |
| ७. | जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र शेलार, ता.भिवंडी जि.ठाणे येथे प्रयोगशाळा इतारतीचे मागील बाजूस गटार बांधणे. | Rs.233595.00 |
| ८. | जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र शेलार, ता.भिवंडी जि.ठाणे येथील मुख्य रस्ता पासुन अंतर्गत रस्त्याच्या प्रवेश स्थानी मुख्य प्रवेश द्वार बसविणे. | Rs.237721.00 |
| ९. | जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र शेलार, ता.भिवंडी जि.ठाणे येथील गोदाम इमारतीचे पुढील व मागील बाजू विकसित करणे. | Rs.236543.00 |

१. वरील अंदाजीत रक्कमेत जी.एस.टी.समाविष्ठ नसुन ठेकेदारांनी निविदेत दर भरताना जी.एस.टी.वगळून दर नमुद करावा. अंदाजीत रक्कमेवर नमुद केलेल्या दरानुसार आलेल्या रक्कमेवर जी.एस.टी. १२ टक्के पर्यंत वेगळा अदा करण्यांत येईल.
२. निविदा उपलब्ध कालावधी दिनांक २३/०९/२०२४ @११.०० ते दिनांक ३०/०९/२०२४ रोजी १७:३० पर्यंत.
३. निविदा स्विकारणे कालावधी दिनांक ०१/१०/२०२४ रोजी दुपारी १२:००
४. निविदा उघडणे दिनांक ०१/१०/२०२४ रोजी दुपारी १२:३० नंतर (सोईस्कर वेळेनुसार)

(सदर निविदेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर व सुचना फलकावर कळविण्यात येईल)
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई-४०००६५, कार्यालयातील सूचना फलक.

जा. क्रं. साबांविप्रवि -आरे/नि.लि./
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,
आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई ४०००६५.
दुरध्वनी क्रं. ०२२-२९२७२४४७
दिनांक:

कार्यकारी अभियंता
सा.बां.विशेष प्रकल्प विभाग,
आरे, गोरेगाव, पूर्व, मुंबई-४०००६५.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/३३०३


# भ्रष्टाचाराचे आरोप असलेले ९६ पालिका अधिकारी पुन्हा नोकरीवर, निवडणूकीच्या तोंडावर निलंबन मागे

■ **मुंबई : गणेश बागडे**

भ्रष्टाचाराचे आणि फौजदारी स्वरुपाचे आरोप असलेल्या ९६ पालिका अधिकाऱ्यांना मुंबई महापालिकेने पुन्हा एकदा सेवेत घेतले आहे. लोकसभा निवडणूकीच्या काही आठवडे आधी, निलंबन पुनरावलोकन समितीच्या निर्णयानंतर या अधिकाऱ्यांना सेवेत घेण्यात आले. या अधिकाऱ्यांमध्ये १९ जणांवर गुन्हेगारी स्वरुपाचे आरोप असल्याचे माहिती अधिकारातून उघड झाले आहे.

मुंबई महानगरपालिकेने निलंबित केलेले तब्बल ९६ अधिकारी, अभियंते यांना पुन्हा एकदा कामावर घेतले आहे. त्यातील १९ जणांवर गुन्हेगारी स्वरुपाचे आरोप आहेत तर ७७ जणांवर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत. या अधिकाऱ्यांना निलंबन पुनरावलोकन समितीच्या निर्णयानुसार पुन्हा नियुक्त करण्यात आले आहे. या बाबत २७ मार्च २०२४ रोजी या समितीची बैठक झाली होती. त्यात हा निर्णय झाला होता. यंग व्हिसलब्लोअर्स फाउंडेशनचे जितेंद्र घाडगे यांना माहिती अधिकारातून ही माहिती मिळाली आहे.

भ्रष्टाचाराची सर्वाधिक प्रकरणे नगर अभियंता विभागातील असून तेथील २८ अभियंते पुन्हा सेवेत आले आहेत. गुन्हेगारी प्रकरणांमध्ये घनकचरा व्यवस्थापन विभागात सर्वाधिक आरोपी अधिकारी आहेत. त्यातील १२ अधिकाऱ्यांना पुन्हा सेवेत घेतले आहे. पालिकेच्या या



दोन विभागांवर अनेक वर्षापासून भ्रष्टाचाराचे आरोप होत आले आहेत, परंतु फारशी कारवाई झालेली नाही. पुनरावलोकन समितीची बैठक यापूर्वीही झाली होती. २७ मार्चपूर्वी ५ नोव्हेंबर २०२०, ३१ ऑगस्ट २०२३, ११ सप्टेंबर २०२३ आणि १९ डिसेंबर २०२३ रोजी अशा बैठका झाल्या आहेत. पालिकेने या बैठकांचे इतिवृत्त देण्यास मात्र नकार दिला आहे. हे ‘विशेषाधिकार दस्तऐवज’ असल्याचे सांगण्यात आले. मात्र, यापूर्वी अशा दस्तऐवजांची प्रत उपलब्ध करून देण्यात आली आहे, त्यामुळे याबाबत संशय व्यक्त करण्यात येत आहे.

मुंबई महानगरपालिका प्रशासन सार्वजनिक हितासाठी काम करते की भ्रष्ट आणि शक्तिशाली लोकांच्या हितासाठी काम करते असा प्रश्न घाटगे यांनी उपस्थित केला आहे. भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या अधिकाऱ्यांविरुद्ध कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. निवडणुकीच्या काही काळ आधी या अधिकाऱ्यांना पुन्हा सेवेत घेणे संशयास्पद आहे. विशेषत: हे अधिकारी निवडणूक कर्तव्यातही सहभागी होते असा आरोप घाटगे यांनी केला आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) आकडेवारीनुसार, १६ प्रकरणांमध्ये बीएमसीने एसीबीला दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध खटला चालविण्यासाठी मंजुरी अद्याप दिलेली नाही.

# केंद्र सरकारकडून मंकीपॉक्सच्या प्रादुर्भावाविषयी राज्यांना सूचना

■ **नवी दिल्ली : प्रगती शर्मा**

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने मंकीपॉक्स विषाणूसंदर्भात सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना सजग राहण्याचे निर्देश दिले आहेत. भारतात ‘मंकीपॉक्स क्लेड १ बी’चा नवीन रुग्ण आढळला आहे. या प्रकारचा रुग्ण आढळणारा भारत हा आफ्रिके बाहेरील तिसरा देश ठरला आहे. केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाने जारी केलेल्या निर्देशानुसार



मंकीपॉक्स संशयित रुग्णांना विलगीकरणात ठेवण्याबरोबरच रोग प्रतिबंधक उपाययोजना कडकपणे राबवण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. चाचणीसाठी ठरवलेल्या प्रयोगशाळांची यादीही उपलब्ध करण्यात आली आहे. केंद्र सरकारने जारी केलेल्या निर्देशांमध्ये रुग्णालयीन व्यवस्थापन, रोग प्रतिबंधक उपाययोजना आणि जनजागृतीसाठी विशेष धोरणांचा समावेश करण्यात आला आहे. जागतिक आरोग्य संघटनेने १४ ऑगस्ट रोजी मंकीपॉक्स विषाणूचा प्रादुर्भाव आंतरराष्ट्रीय आरोग्य आणिबाणी म्हणून घोषित केली असल्याचे आरोग्य मंत्रालयातील सूत्रांनी स्पष्ट केले. २००५ च्या आंतरराष्ट्रीय आरोग्य नियमांनुसार भारत या घोषणेचा भाग आहे. राज्य सरकारांना आरोग्य सुविधांमध्ये तयारी करण्याचे आदेश देण्यात आले असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांना राज्य व जिल्हा स्तरावर आढावा बैठक घेण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. ‘मंकीपॉक्स क्लेड १’चे लक्षणे ‘क्लेड २’सारखीच असली तरी, ‘क्लेड १’मध्ये धोका अधिक असल्याचे आरोग्य मंत्रालयाने नमूद केले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग
सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,
आरे गोरेगाव,(पूर्व),मुंबई -४०००६५.
निविदा सूचना क्रमांक ०७ सन २०२४-२०२५

कार्यकारी अभियंता, सा.बा. विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई - ४०० ०६५ सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत मजूर सहकारी संस्था ( फक्त मुंबई उपनगर जिल्हा (पश्चिम) करीता) कुशल अ-वर्ग कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता ब -१ नमुन्यातील निविदा ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर www.mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कोणतेही कारण न देता सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्रं | कामाचे नांव | रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| १. | संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली येथील गांधी टेकडी परिसरामधील शौचालय, पदपथची दुरुस्ती, सुशोभिकरण, सुधारणा आणि इतर अनुषंगिक कामे करणे. | Rs. 4985637.00 |
| २. | संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली येथील संक्रमण प्राणी रुग्णालय दुय्यम पिंजऱ्याचे बांधकाम करणे. | Rs. 2747784.00 |

ई - निविदा वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा डाऊनलोड करण्यांचा कालावधी | दिनांक २३/०९/२०२४ @ १५:०० पासून दिनांक ३०/०९/२०२४ @ १७:०० पर्यंत. |
| २ | निविदा सादर करण्याचा कालावधी | दिनांक २३/०९/२०२४ @ १५:०० पासून दिनांक ३०/०९/२०२४ @ १७:०० पर्यंत. |
| ३ | निविदा उघडण्याचे ठिकाण दिनांक व वेळ (शक्य झाल्यास) | दिनांक ०१/१०/२०२४ सकाळी १७:१५ वाजता (शक्य झाल्यास) कार्यकारी अभियंता, सा.बां.विशेष प्रकल्प विभाग आरे, गोरेगाव ,मुंबई-४०००६५ यांचे कार्यालय |

खालील संकेतस्थळावर ई निविदाची सर्व माहितो उपलब्ध आहे.
१. https://mahapwd.com
२. https://mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनामध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वरती कळविण्यांत येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई-४०००६५. कार्यालयातील सूचना फलक.

जा. क्रं. साबांविप्र-आरे/नि.लि./
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,
आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई ४०००६५.
दुरध्वनी क्रं. ०२२-२९२७२४४७
दिनांक:-

कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,
आरे, गोरेगाव, पूर्व, मुंबई-४०००६५.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/३३०२

# निवडणुकीपूर्वी गृहनिर्माण धोरण ठरविण्यासाठी सत्ताधाऱ्यांची घाई

■ **मुंबई : यश सावंत**

राज्याचे गृहनिर्माण धोरण १७ वर्षानंतर जाहीर होत असून त्याबाबत मसुदा जारी करण्यात आला आहे. या मसुद्यावरील हरकती व सूचनांसाठी फक्त सात दिवसांचा अवधी देण्यात आला आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्याचे गृहनिर्माण धोरण घाईघाईत मंजूर करण्याचा महायुतीचा प्रयत्न दिसून येत असल्याचा आरोप केला जात आहे. २००७ मध्ये राज्याचे गृहनिर्माण धोरण विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना जाहीर झाले. २०१४ मध्ये शिवसेना-भाजप युतीचे शासन सत्तेवर आले तेव्हा या धोरणाचा मसुदा तयार झाला होता. परंतु प्रत्यक्षात धोरण जाहीर करण्यात आले नाही. आताही या धोरणाचा मसुदा निश्चित करण्यात आला आहे. ९४ पानांचा



हा मसुदा गृहनिर्माण विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. या मसुद्यावर हरकती व सूचना सादर करण्यासाठी ३ ऑक्टोबर ही अंतिम मुदत देण्यात आली आहे. याबाबतच्या जाहिराती वृत्तपत्रात शनिवारी प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. गेल्या १७ वर्षात स्थावरसंपदा क्षेत्रात बदल झाला आहे. मुंबईसाठी असलेली विकास नियंत्रण नियमावली २०३४ आणि राज्यासाठी असलेली एकत्रित विकास नियंत्रण नियमावली यांमुळे सर्वांसाठी घरे तसेच झोपडीमुक्त महाराष्ट्र साकारण्यासाठी असलेल्या आव्हानांचा विचार करून हे धोरण तयार करण्यात आल्याचा दावा गृहनिर्माण विभागाने केला आहे. या धोरणाच्या मसुद्यावर हरकती-सूचना सादर करण्यासाठी फक्त सात दिवसांचा कालावधी खूप कमी असल्याचे मुंबई ग्राहक पंचायतीने म्हटले आहे. ही मुदत किमान महिनाभर असावी, अशी मागणी गृहनिर्माण विभागाच्या प्रधान सचिव वल्सा नायर-सिंग यांच्याकडे केली आहे. हा फक्त गृहनिर्माण धोरणाचा मसुदा आहे. अद्याप धोरण निश्चित झालेले नाही. अधिकाधिक व्यक्ती, संबंधितांशी चर्चा करूनच धोरणाचा मसुदा तयार करण्यात आला आहे. तरीही आणखी सहभाग वाढावा आणि खुलेआम चर्चा व्हावी, या दिशेने हरकती-सूचना मागविण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र क्राईम टाइम्स



# फेरीवाला नियोजनात पालिकेची उदासीनता

■ वसई : सुचिता देशमुख

**वसई विरार शहरात फेरीवाल्यांची समस्या अधिकच जटिल बनली आहे. फेरीवाल्यांची समस्या सोडविण्यासाठी महापालिकेने सर्वेक्षण करून यादी प्रसिध्द केली. मात्र ही यादी २०१६ मध्ये केलेल्या सर्वेक्षणातील आहे. त्यामुळे ८ वर्षे जुनी यादी प्रसिध्द करून पालिका फेरिवाल्यांचे नियोजन कसे करणार असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे. मुंबईला लागूनच असलेले वसई विरार शहरात हळूहळू गजबजू लागले आहे. या शहरात फेरीवाल्यांची संख्या बेसुमार वाढू लागली आहे. शहरातील मुख्य रस्ते, शहरांतर्गत रस्ते,पदपथ, मोकळया जागा, पादचारी पूल, रेल्वे स्थानकालगतचा परिसर अशा सर्वच ठिकाणी आता फेरीवाल्यांचे साम्राज्य तयार होऊ लागले आहे. यावर पालिकेकडून ना कारवाई, ना कोणतेही नियोजन यामुळे फेरीवाले शहरासाठी डोकेदुखी ठरू लागले आहेत.**

शहराच्या वाढत्या नागरीकरणासोबत शहरात विविध समस्या निर्माण होऊ लागल्या आहेत. त्यातच आता सार्वजनिक ठिकाणी फेरीवाल्यांचे होणारे वाढते अतिक्रमण ही समस्या अधिक जटिल बनली आहे. शहरात फेरीवाल्यांची समस्या गेली कित्येक वर्षे तशीच आहे, त्यावर तोडगा शोधण्याचे प्रयत्न झालेच नाहीत. याचा मोठा परिणाम हा शहरात दिसू लागला आहे. शहरातील नागरिकांना रस्त्यावर, फुटपाथवर सोयीस्कररीत्या चालता यावे यासाठी तयार केलेली सारीच ठिकाणे या फेरीवाल्यांनी अडवली आहेत. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांनी चालायचे कुठून असा प्रश्न निर्माण झाला आहे.

अनेकदा या फेरीवाल्यांच्या विरोधात कारवाई करण्यात यावी अशी मागणी नागरिक करीत असतात. त्यावर केवळ थातुरमातुर कारवाई करून केवळ वेळकाढू पणा केला जातो. पुन्हा परिस्थिती तशीच असते. खरं तर जेव्हा फेरीवाले अतिक्रमण करण्यास सुरुवात करतात त्याच वेळी त्यांना रोखायला हवे तसे होत नसल्याने त्याचा परिणाम शहरात दिसू लागला आहे. काहीवेळा अधिकारी कारवाईला गेल्यास अधिकाऱ्यांवर हल्ले चढविले जात असल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यातून पालिका प्रशासन काहीच बोध घेत नाही. सध्या फेरीवाले पदपथ, रस्ते, पूल हे सर्व आपल्याच मालकीचे असल्यासारखे वावरत असल्याचे चित्र शहरात आहे. अनधिकृत फेरीवाल्यांमुळे तसेच नियमबाह्य भरविण्यात येत असलेल्या बाजारांमुळे वसई-विरार शहरात वाहतुक कोंडी, अस्वच्छता, रोगराई, प्रदूषण इत्यादी समस्यांना नागरिकांना सामोरे जावे लागत आहे. रेल्वे स्थानक परिसरातील फेरिवाले बसता कामा नये असे सर्वोच्च



न्यायालयाने निर्देश आहेत. मात्र ते डावलून फेरिवाले बसत असतात. त्यामुळे नागरिकांना तर चालणे देखील जिकरिचे झाले आहे.

वसई विरार पालिका फेरीवाला नियोजनासाठी प्रयत्न करीत असल्याचा दावा केला जात असला तरी सध्याचा परिस्थितीवरून फेरीवाला नियोजनात पालिका अपयशी ठरली आहे.फेरीवाल्यांची नोंदणी, बसण्याच्या जागा, त्यांचे सर्वेक्षण, जर योग्यरीत्या झाले नाही तर येत्या काळात शहरातील फेरीवाल्यांची समस्या बिकट होणार आहे. वाढते फेरीवाले, त्यांची उपजीविका आणि त्यांच्या विक्रीचे विनियमन याकरिता तात्काळ पथविक्रेता समितीची स्थापना करून फेरीवाला धोरण तयार करण्याबाबतचे आदेश राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने राज्यातील सर्व महापालिकांना दिले होते. जिल्हाधिकाऱ्यांकडे फेरिवाल्यांची यादी पाठवून त्यातून निवडणूकीद्वारे ही समिति तयार केली जाणार आहे. मात्र वसई-विरार महापालकेने ही प्रक्रिया केली नव्हती. त्यामुळे आता घाईघाईत फेरीवाल्यांची बैठक घेऊन १५ हजार १५६ इतके फेरीवाले शहरात असल्याची यादी प्रसिद्ध करून हरकती आणि सूचना मागविल्या आहेत. मात्र यासाठी पालिकेने प्रसिद्ध केलेली यादी ही आठ वर्षे जुनी आहे. २०१६ मध्ये पालिकेने बायोमॅट्रीक सर्व्हेक्षण करून प्रसिद्ध केलेली यादीच पालिकेने नव्याने प्रसिद्ध केली असल्याचे आरोप होऊ लागले आहेत.

## वसईत वनपाल आणि वनरक्षक लाच घेताना रंगेहात पकडले; पालघर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

■ वसई : प्रतिनिधी

**वनविभागाच्या वसई गोखिवरे रेंजनाका वाघराळ बिट परिमंडळ कार्यालयातील वनपाल व वनरक्षक या दोन कर्मचाऱ्यांना १ लाख ३० हजारांच्या लाच प्रकरणी पालघर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने अटक केली आहे. गुरुवारी रात्रीच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली आहे.**

वनरक्षक पन्नालाल बेलदार (३५) आणि वनपाल पंकज सनेर (४५) अशी अटक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची नावे आहेत. तक्रारदार यांच्या मालकीची मुंबई-अहमदाबाद महामार्गावर समांतर चाळ आहे. सदर चाळीतील खोल्यांना महामार्गाच्या विरुध्द बाजूने दरवाजे आहेत. तक्रारदार यांनी या चाळीतील खोल्यांना येण्याजाण्याच्या सोयीसाठी महामार्गाच्या दिशेने दरवाजा काढण्याचे काम सुरु केले होते. यासाठी वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी तक्रारदाराला कार्यालयात बोलावून महामार्गाची बाजू ही वन विभागाची हद्द असून त्या बाजूला दरवाजे काढले असल्याने त्यांना वन कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल अशी धमकी दिली होती.



त्यावेळी तक्रारदाराने कारवाई न करण्याची विनंती केली. त्यानंतर वन कर्मचाऱ्यांनी प्रत्येक खोलीमागे ८० हजार रुपये अशी ३ खोल्यांसाठी लाचेची मागणी केली होती. कारवाई टाळण्यासाठी तक्रारदाराने रकमेपैकी ९० हजार रुपये १६ सप्टेंबरला दिले. उर्वरित पैशांसाठी २५ सप्टेंबर पर्यंत मुदत मागितली होती. मात्र वनकर्मचाऱ्यांनी पैशांसाठी तगादा लावल्याने तक्रारदाराने पालघरच्या लाचलुचपत विभागात तक्रार केली.

या तक्रारीनंतर लाचलुचपत विभागाने गोखिवरेच्या रेंज नाका येथील वनविभागाच्या कार्यालयात सापळा रचून वनरक्षक पन्नालाल याला ४० हजारांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले.त्यानंतर वनपाल पंकज सनेर यालाही अटक केले आहे.पडताळणीत दोघांनी ९० हजार रुपये स्विकारले असून उर्वरित रक्कम तडजोडीअंती १ लाख ३० हजार रुपयांची मागणी केल्याचे स्पष्ट झाले असल्याची माहिती पालघर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पोलीस उपअधीक्षक हर्षल चव्हाण यांनी सांगितले आहे. याप्रकरणी वालीव पोलीस ठाण्यात दोन्ही आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## भरावासाठी मातीऐवजी राडारोडा; भूमाफियांकडून महसूल परवान्याला बगल

■ ठाणे : तृप्ती गोरे

वसई विरार मध्ये विकासकामासाठी भरावासाठी माती ऐवजी आता राडा रोडा आणून टाकला जात आहे. त्यामुळे भूमाफियांकडून एकप्रकारे महसूल परवान्याला बगल देऊन कामे जोरात सुरू झाली आहेत. राडारोडा (डेब्रिज )हा गौण खनिज मध्ये येत नसल्याने त्यावर कारवाई करण्यास ही महसूल विभागाला अडचणी निर्माण होऊ लागल्या आहेत.

मुंबई उपनगराला लागून असलेल्या वसई विरार भागात मागील काही वर्षात विकासकामे झपाट्याने वाढू लागली आहे. यात इमारती सह विविध ठिकाणी अनधिकृत पणे चाळींचे साम्राज्य तयार होत आहे. या विकास कामाच्या दरम्यान जागेच्या सपाटीकरणासाठी मोठ्या प्रमाणात गौण खनिज अर्थात माती लागते. या मातीच्या भरावासाठी महसूल विभागाकडून परवाने (रॉयल्टी) दिली जाते. यातून महसूल विभागाला महसूल मिळतो.

मात्र बहुतांश भागात त्यातून पळवाट काढण्यासाठी राडारोड्याचा वापर करून सर्रासपणे माती भराव केला जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. तर काही जण माती असल्याचे समजून येऊ नये यासाठी त्यात अर्धा राडारोडा व अर्धी माती एकत्रित करून माती भराव केला जात आहे. अशा प्रकारामुळे



महसूल विभागाचा कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडतो. विशेष महामार्गालगत, बेकायदेशीर चाळीच्या बांधकाम ठिकाणी अशा प्रकारे राडारोडा टाकून भराव केला जात आहे. यामुळे पाणी जाण्याच्या नैसर्गिक वाटा ही बंद होऊ लागल्या आहे. सध्या मुंबई सारख्या शहरात विकासकामादरम्यान निघणारा राडारोडा हा गोळा करून रस्त्याच्या कडेला व बेकायदेशीर भराव करण्यासाठी वापरला जात आहे. याबाबत अनेक तक्रारी या महसूल विभागाकडे येतात. मात्र राडारोडा( डेब्रिज) हे गौण खनिज मध्ये येत नसल्याने त्यावर कोणतीही कारवाई करता येत नसल्याने महसूल विभागापुढे अडचणी निर्माण होऊ लागल्या आहेत.

## दोन वर्षात ३५ हजार उद्योजक निर्माण झाले; उदय सामंत यांचा दावा

■ उरण: आकाश कांबळे

महाराष्ट्रात दोन वर्षात ३५ हजार उद्योजग निर्माण झाल्याचा दावा शनिवारी उलवे नोड मधील महाराष्ट्राची उद्योग भरारी कार्यक्रमात बोलतांना राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी केला.एमआयडीसीने महाराष्ट्राच्या उद्योगा विभागाने विविध योजना,महत्वकांक्षी निर्णय,नवनवीन प्रकल्प,विदेशी गुंतवणूक या माध्यमातून कोकण विभागीय महाराष्ट्राची उद्योग भरारी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. विकास कामांचा आढावा घेण्यासाठी महाराष्ट्राची उद्योग भरारी कार्यक्रमाचे आयोजन शनिवार दि. बा. पाटील भूमिपुत्र भवन,उलवे नोड येथे आयोजित करण्यात आला होता. एमआयडीसी ने ३०० औद्योगिक क्षेत्र अडीच लाख एकर क्षेत्रावर उद्योग प्रस्तावित आहे.


### वसई–विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती (ई) नालासोपारा (पश्चिम)**

**मुख्य कार्यालय विरार**

**दूरध्वनी क्र. १२२५०-२४०२१७९/२४०२५३६३**

**जाहिर नोटीस**

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | रिसीट नं. | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | सोपारा-२ | NL३२/५१५/२५ | २३५५ | रझाक अली खान | शेख समसार |
| २. | समेळ-१ | NL०८/२२६/९ | २४१२ | तपन प्रभाकर सुगवकर | प्रथमेश निरंजन पवार/निरंजन रामचंद्र पवार |
| ३. | समेळ-२ | NL०९/११८/३६ | २४१० | सालेहा खातून हनीफ खान | लक्ष्मण बाबू भोसले |
| ४. | सोपारा-२ | NL३२/६०२/१४ | २३०५ | रियाज अहमद इजरुलहक शेख | फहमीदा बानो |
| ५. | सोपारा-२ | NL३२/५९३/२० | २३०१ | इरफान मो. फारुक काझी | फिरोज मोहम्मद फारुक काझी |
| ६. | सोपारा-२ | NL३२/५८४/२ | २३०६ | तारीक हुसैन शेख | अमीन रशीद रजा |
| ७. | सोपारा-२ | NL३२/५३३/२७ | २२९७ | रफीक अयुब खान | फरहाना अयान शेख |
| ८. | समेळ-२ | NL०९/८७/९ | २३५३ | सत्यपाल अ. सागर | आशा सत्यपाल सागर |
| ९. | समेळ-२ | NL०९/२१/१४ | २३५१ | विश्वनाथ नारायण राणे | वृषाली विश्वनाथ राणे |
| १०. | समेळ-२ | NL०९/१३७/५८ | २३७६ | त्रिमुर्ती कंस्ट्रक्शन | सुलोचना एस वालावकर |
| ११. | सोपारा-१ | NL३१/९२/२३ | २४५८ | सिल्वर लॅण्ड डेव्हलपर्स | सुजान परमानंदा बेडरा |
| १२. | समेळ-२ | NL०९/९१/४० | २४३४ | विशाल सोमनाथ काळे | युवराज आनंदराव कंभार |
| १३. | समेळ-२ | NL०९/११६/३ | २५९५ | जयश्री एन सालियन | जयश्री अलंकार दिवे |
| १४. | सोपारा-१ | NL३१/९६/१० | २५०९ | हंसा छेदीलाल गुप्ता | मोहम्मद अकरम कासार |
| १५. | सोपारा-१ | NL३१/१२८/९१ | २४८० | जय बिल्डर्स डेव्हलपर्स | प्रकाश चिमण सोलंकी व कलावंती प्रकाश सोलंकी |
| १६. | सोपारा-२ | NL३२/५५२/८ | २४९४ | फ्लोरा कंस्ट्रक्शन | मोहम्मद अय्यबअली साहेब सबर |
| १७. | सोपारा-१ | NL३१/९६/२७ | २५२८ | भाग्योदय कंस्ट्रक्शन | अशोक कुमार साहु गुडीया देवी साहू |
| १८. | सोपारा-२ | NL३२/५८७/३३ | २६०० | रुबीना मजूर काद्री | रियाज अहमद शेख |
| १९. | सोपारा-१ | NL३१/९२/२५ | २४९८ | क्रिष्णा दात | बंसताकुमार स्वाईन व चिरस्मीता बंसता स्वाईन |

जावक क्र.:-व.वि.श.म./क.वि.१३२१/२०२४-२०२५
दिनांक: २४-०९-२०२४

(संतोष पाटील)
सहाय्यक आयुक्त
प्रभाग समिती (ई) नालासोपारा


## वसई विरार मधील हजारो जन्म-मृत्यू दाखले प्रलंबित, नव्या पोर्टलच्या तांत्रिक त्रुटीचा फटका

■ वसई : सचिन कदम

**जन्म मृत्यूचे दाखले काढण्यासाठी जुलै पासून सुरू करण्यात आलेल्या नव्या नागरी नोंदणी पोर्टलमध्ये (सीआरएस) असलेल्या तांत्रिक त्रुटींचा फटका बसू लागला आहे. यामुळे मागील ३ महिन्यांपासून शहरातील हजारो नागरिकांचे जन्म आणि मृत्यूचे दाखले प्रलंबित आहेत. हा तांत्रिक दोष दूर करण्यासाठी पालिकेकडून केंद्र आणि राज्य शासनाकडे तक्रारी करून पाठपुरावा केला आहे.**

नागरिकांना जन्म मृत्यूचे दाखले महानगरपालिकांमार्फत देण्यात येतात. २०२६ पासून केंद्र शासनाच्या सीआरएस म्हणजे नागरी नोंदी सिस्टिम (सिव्हिल रजिस्ट्रेशन सॉफ्टवेअर) नावाच्या पोर्टलद्वारे हे दाखले देण्यात येऊ लागले. तो पर्यत काही अडचण नव्हती. जुलै महिन्यापासून केंद्र शासनाने महापालिकांना अपडेटेड सीआरएस पोर्टल दिले. परंतु पहिल्या दिवसापासूनच या पोर्टलमध्ये तांत्रिक अडचणी भेडसावू लागल्या आहेत. हे पोर्टल अंत्यंत धीमे सुरू असून एक एण्ट्री करण्यासाठी एक एक तासांचा वेळ लागत आहे. एण्ट्री केल्यानंतर सुध्दा ओटीपी वेळेवर येत नाही. मध्येच हे पोर्टल बंद पडत असते. जुन्या नोंदी शोधण्यासाठी असलेले दिनदर्शिकाच खुली होत नाही. नोंद केलेल्या दाखल्यांची प्रिंट काढतांना अडचणी येत आहेत जोडाक्षरे असलेली नावे चुकीच्या पध्दतीने प्रिंट होत असतात. एवढे करूनही जरी पालिकेने नोंद केली तरी त्याच जिल्हा स्तरावरून मंजूरी येण्यासाठी भरपूर वेळ लागतो. त्यामुळे जुलै पासून कुणालाही जन्म




मृत्यूचे दाखले देण्यात आलेले नाही. वसई विरार महापालिकेने ९ प्रभागात या सीआरएस पोर्टल मार्फत दाखले देण्याची प्रक्रिया सुरू केली होती. नागरिकांनी अर्ज केल्यानंतर दोन दिवसांत दाखले मिळणे अपेक्षित असते. परंतु या तांत्रिक त्रुटीमुळे दाखले मिळत नसल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. एकीकडे गतीमान सरकार असा टेंभा मिरवत असते. परंतु केंद्र शासनाची संगणकीय यंत्रणा किती तकलादू आणि कुचकामी आहे, ते यावरून दिसून येत असल्याचा आरोप कॉंग्रेसचे कुलदिप वर्तक यांनी केला आहे. मागील ३ महिन्यांपासून दाखले मिळत नसल्याने नागरिकांची कामे खोळंबली आहे. मृत्यूदाखले नसल्याने निवृत्तीवेतनाला अडचणी येत आहेत. ही अडचण दूर करण्यासाठी केंद्र आणि राज्यकडून कुठलीही मदत पालिकेला मिळत नसल्याचे पालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. सीआरएस पोर्टल मध्ये दोष असल्याने नागरिकांना जन्म-मृत्यूचे दाखले मिळत नाही.

## वसईतील खदाणी धोकादायक! वसई नवजीवन येथील खदाणीत दोन मुलांचा बुडून मृत्यू

■ वसई : सुचिता देशमुख

वसई विरार शहरात एकापाठोपाठ एक अशा खदाणीत बुडून मृत्यू होण्याच्या घटना घडत आहेत. वसई पूर्वेच्या नवजीवन येथे दोन मुलांचा खदाणीत बुडून मृत्यू



झाला आहे. गुरुवारी दुपारी तीन च्या सुमारास ही घटना घडली.नसीम रियाजअहमद चौधरी (१३), सोपान सुनिल चाव्हाण (१४) अशी या मृत्यू झालेल्या मुलांची नावे आहेत. वसई पूर्वेच्या नवजीवन परिसरातील खदाणी आहेत. पावसाळा असल्याने या खदाणी पाण्याने भरून गेल्या आहे. गुरुवारी दुपारी गांगडीपाडा येथे राहणाऱ्या चार ते पाच जणांचा ग्रुप अंघोळीसाठी खदाणीत गेले होते. अंघोळ करताना नसीम आणि सोपान या दोघांना पाण्याचा अंदाज न आल्याने खदाणीत बुडाले. याची माहिती आजूबाजूला राहणाऱ्या नागरिकांना मिळताच मुलांना बाहेर काढून त्यांना रेंज नाका येथील प्लॅटिनियम रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. नाका तोंडात पाणी गेल्याने डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी वालीव पोलीस ठाण्यात अपघाती मृत्यूची नोंद केली आहे. पावसाळा सुरू झाल्यापासून नदी, तलाव, खदाणी, धबधबे अशा ठिकाणी बुडून मृत्यू होण्याच्या घटना वाढत असल्याने चिंता व्यक्त केली आहे.

## बदलापूरच्या उपजिल्हा रुग्णालयाला सामान्य रुग्णालयाचा दर्जा

■ अंबरनाथ : सतिश सोनावणे

बदलापूरसह आसपासच्या ग्रामीण भागातील रुग्णांसाठी महत्त्वाच्या असलेल्या बदलापूर शहरातील उपजिल्हा रुग्णालयाचे रूप लवकरच बदलणार असून ५० खाटांचे हे रुग्णालय आता २०० खाटांचे होणार आहे. राज्य सरकारच्या आरोग्य विभागाने या रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याचा निर्णय घेतला आहे. शस्त्रक्रिया विभागासह विविध आरोग्यांचे तज्ञ, रक्तपेढी यासह इतर अनेक सुविधा उपलब्ध होणार आहेत. त्याचा लाखो नागरिकांना फायदा होणार आहे. बदलापूर शहरात असलेले उपजिल्हा रुग्णालय बदलापूर शहरासह अंबरनाथ तालुक्यातील ग्रामीण रुग्णांसाठी उपयोगी आहे. बदलापूर शहरातील अनेक रुग्ण येथे येत असतात सात वर्षापूर्वी २०१७ या वर्षात या रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्यात आला होता. त्यावेळी खाटांची संख्या ५० करण्यात आली होती. आता शासनाच्या आरोग्य विभागाने या रुग्णालयाचे श्रेणी वर्धन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता येथील खाटांची संख्या २०० होणार आहे. येथील प्रसूती विभाग, सामान्य रुग्ण विभाग यातील खाटांची संख्याही




यामुळे वाढणार आहे. सोबतच अतिदक्षता विभागाची ही सुरुवात या रुग्णालयात होणार आहे. यापूर्वी शासकीय रुग्णालयातील अतिदक्षता विभागात रुग्ण दाखल करण्यासाठी उल्हासनगरच्या मध्यवर्ती रुग्णालयात जावे लागत होते. येथे खाटा पूर्ण क्षमतेने भरलेले असल्यास कळवा किंवा मुंबईला रुग्णाला स्थलांतरित करावे लागत होते.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग,**
**प्रशासकीय इमारत, १ ला मजला,**
**भवन्स कॉलेज जवळ, दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०००५८.**
E-mail-northmumbai.ee@mahapwd.gov.in
**ई -निविदा सुचना क्र. १४ सन २०२४-२०२५**

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई (दुरध्वनी/फॅक्स क्रमांक- २६२३१९६४/२६२०५७८८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https//mahatenders.gov.in व **www.mahapwd.com** येथे उपलब्ध असतील. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार अधीक्षक अभियंता, मुंबई (सा.बां.) मंडळ, फोर्ट, मुंबई तसेच कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, अंधेरी (प.), मुंबई यांनी राखून ठेवला अहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र | कामाचेनांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | मुळगौण कामांतर्गत देवनार येथे पुनर्वसन केंद्र कार्यालय बाजू, सुशोभीकरण आणि लॅंडस्केपिंग करणे. | रु.२२७५५५३/- |
| २ | मुळगौण कामांतर्गत देवनार येथे पुनर्वसन केंद्र दवाखाना बाजू, सुशोभीकरण आणि लॅंडस्केपिंग करणे. | रु.२२५२३३१/- |
| ३ | मुळगौण कामांतर्गत देवनार येथे पुनर्वसन केंद्र बॅरक बाजू, सुशोभीकरण आणि लॅंडस्केपिंग करणे. | रु.२५०४२८७/- |
| ४ | मुळगौण कामांतर्गत बालकल्याण नगरी. चिल्ड्रन एड सोसायटी, मानखुर्द. मुंबई येथे खेळाच्या मैदानाचे आणि आसन व्यवस्थेचे अपग्रेडेशन करणे. | रु.२३७०५६२/- |
| ५ | मुळगौण कामांतर्गत बालकल्याण नगरी. चिल्ड्रन एड सोसायटी, मानखुर्द येथे पी/एफ चेनलिंक फेन्सिंग,करणे | रु.२९५८८०६/- |
| ६ | मुळगौण कामांतर्गत मानखुर्द येथील चेंबूर चिल्ड्रन होम, बॅरेक क्र. ६ ते ११ चेकर टाइल्स देणे आणि घालणे. | रु.१०३७३४१/- |
| ७ | मुळगौण कामांतर्गत मानखुर्द येथील चेंबूर चिल्ड्रन होम स्टाफ बॅरेक चेकर्ड टाइल्स देणे आणि घालणे. | रु.१७३३३२५/- |

टिप :- वरिल "ई" निविदा सुचना https//mahatenders.gov.in व **www.mahapwd.com** येथे पहावयास तसेच डाऊनलोड करावयास मिळेल. सदर निविदे सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास या वेब साईटवर कळविण्यात येईल.
**ई- निविदा उपलब्ध कालावधी- दि. १८.०९.२०२४ ते दि. २५.०९.२०२४ पर्यंत**
**ई - निविदा उघडणे - दि. २६.०९.२०२४ दुपारी १५.०० वाजता.**

जा.क्र.काअ/उमुंवि/निविदा/ ८८३६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
भवन्स कॉलेजजवळ, दादाभाई मार्ग,
अंधेरी (प.) मुंबई ५८. दिनांक :- 11 SEP 2024

कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग,
अंधेरी, मुंबई.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/३३११

# आचारसंहितेपूर्वी उद्घाटनांचा धडाका: 'डबल इंजिन'मुळे राज्याच्या विकासाला गती- मोदी

■ पुणे : अभिजीत येरल्लू

राज्यात विधानसभा निवडणुकीचे वारे अधिक जोमाने वाहू लागले असतानाच रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ११ हजार २४० कोटींच्या काही प्रकल्पांचे लोकार्पण तर काही प्रकल्पांचे भूमिपूजन केले. पुण्यामध्ये झालेल्या या कार्यक्रमाला पंतप्रधान दूरदृश्यप्रणालीमार्फत उपस्थित होते. या वेळी यापूर्वीच्या सरकारची जुनी कार्यपद्धती आणि मानसिकतेमुळे शहरांचा विकास खुंटल्याची टीका करतानाच शिंदे यांच्या नेतृत्वाखालील 'डबल इंजिन' सरकारमुळे विकासाला गती मिळाल्याचा दावा त्यांनी केला.

पंतप्रधानांच्या हस्ते शिवाजीनगर-मेट्रो या भुयारी मार्गाचे लोकार्पण तसेच स्वारगेट-कात्रज या विस्तारित मेट्रो मार्गाचे भूमिपूजन करण्यात आले. पुण्यातील भिडेवाड्यात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारक, सोलापूर विमानतळ, बिडकीन औद्योगिक क्षेत्र अशा ११ हजार २४० कोटींच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि भूमिपूजन त्यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे केले. या वेळी काँग्रेसच्या कार्यपद्धतीवर टीका करताना पुण्याचा झपाट्याने होणारा विस्तार लक्षात घेता शहरासाठी यापूर्वीच मेट्रोची आवश्यकता होती, असा दावा केला. यापूर्वीच्या सरकारकडे नियोजन आणि दूरदृष्टीचा अभाव असल्याची टीकाही त्यांनी केली. पंतप्रधान म्हणाले की, देशाच्या प्रगतीमध्ये महाराष्ट्राची भूमिका महत्त्वाची आहे. सातत्यामध्ये कोणताही अडथळा आला की राज्याचे नुकसान होते. पुण्यासह राज्यातील अन्य शहरांबाबत हाच प्रकार घडला. मात्र 'विकसित महाराष्ट्र विकसित भारत' उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रयत्न करावे लागतील.



भविष्याच्या दृष्टीने पायाभूत सेवा-सुविधा आणि विकासाचे लाभ प्रत्येक घटकांपर्यंत पोहोचविणे राज्याच्या हिताचे आहे. समाजात बदल घडविण्याची जबाबदारी महिलेकडे येते तेव्हा कशी क्रांती होते, हे सावित्रीबाई फुले यांच्या कार्यातून देशाने पाहिले आहे. मात्र, महिलांबाबतही यापूर्वीच्या सरकारची मानसिकता चुकीची होती. पायाभूत सुविधांअभावी मुलींना शिक्षण अर्धवट सोडावे लागत होते. सैनिक शाळा, लष्करात मुलींना प्रवेश नव्हता. गरोदरपणाची सुट्टीही महिलांना मिळत नव्हती. ही जुनी मानसिकता भाजप सरकारने पूर्णपणे बदलली आहे. सर्व क्षेत्रात महिलांना संधी देत देशाच्या विकासाचे दरवाजे उघडले असल्याचे मोदी म्हणाले. सोलापूर विमानतळाचे लोकार्पण सोहळ्याकडे भाजप आमदार सुभाष देशमुख वगळता महायुतीच्या अन्य दहा आमदारांनी पाठ फिरविल्याचे दिसले. कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण विमानतळावर करण्यात आले. या वेळी देशमुख आणि सोलापूरचे माजी खासदार डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी उपस्थित होते. सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे, माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील व भाजपचे विधान परिषद सदस्य रणजितसिंह मोहिते-पाटील अकलूजमध्ये सुशीलकुमार शिंदे यांच्या सत्कार सोहळ्यासाठी गेले होते.

# 'लक्षात ठेवा, आजपासून तुम्ही हिशेब करायला सुरू करा', सुनील केदारांचा सरकारी अधिकाऱ्यांना इशारा

■ मुंबई : राकेश गायकवाड

विधानसभेची निवडणूक तोंडावर आली आहे. विधानसभेच्या निवडणुकीसाठी आचारसंहिता लवकरच जाहिर होण्याची शक्यता आहे. निवडणुकीच्या अनुषंगाने सर्वच राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणीला जोरदार सुरुवात केली आहे. सध्या अनेक नेत्यांचे महाराष्ट्रभर दौरे सुरु आहेत. या दौऱ्यांच्या माध्यमातून सभा आणि मेळावे सुरु आहेत. विधानसभेला महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा प्रमुख सामना रंगण्याची शक्यता आहे. निवडणुकीच्या आधीच राज्यात राजकारण तापलं आहे.



अशातच काँग्रेसचे नेते तथा माजी मंत्री सुनील केदार यांनी नागपूरमधील एका कार्यक्रमात बोलताना महायुती सरकारवर हल्लाबोल केला. यावेळी त्यांनी सरकारी अधिकाऱ्यांनाही इशारा दिला. 'अधिकाऱ्यांनी देखील लक्षात ठेवावं आजपासून तुम्ही हिशेब करायला सुरु करा', असा इशारा सुनील केदार यांनी दिला आहे.

'सरकारमधील काही अधिकारी वर्ग आहे, त्या अधिकारी वर्गाने भाजपाचा युनिफॉर्म घातला आहे. काही आयएएस अधिकारी, काही आयपीएस अधिकारी आणि कमिश्नर या लोकांना सांगावं लागेल तुम्ही ज्या पद्धतीने वागत आहात, भारतीय जनता पक्षाच्या भरोशावर तुम्ही सर्वसामान्य लोकांना छळण्याचं काम तुम्ही करत आहात. मात्र, आमचं सरकार (महाविकास आघाडीचं) दोन महिन्यांत येणार आहे. त्यामुळे आजपासून हिशेब लिहून ठेवायला सुरवात करा. तुम्हाला तेव्हा सांगू. मी तर ठरवलं आहे की, उद्धव ठाकरे साहेब एकदा तरी हे जे आयएएस आणि आयपीएस अधिकारी आहेत त्यांना एकदा भाजपाचा ड्रेस घालायला लावू आणि सॅल्युट मारायला लावू', असं सुनील केदार यांनी म्हटलं आहे.

# महायुतीचा विरोधी पक्षनेता कोण हे फडणवीस यांनी ठरवावे'; बाळासाहेब थोरात यांना १८० जागा जिंकण्याचा विश्वास

■ पंढरपूर: विशाल कारंडे

महाविकास आघाडीचे जागा वाटप अंतिम टप्प्यात आले आहे. निवडणूक येईल हा निकष आहे. महाविकास आघाडी १८० जागा जिंकेल, असा विश्वास काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केला. तर महायुतीचा विरोधी पक्षनेता कोण होणार हे फडणवीस यांनी ठरवावे, अशी बोचरी टीकाही थोरात यांनी केली. या वेळी त्यांनी भाजपवर सडकून टीका केली. काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात अकलूज येथील कार्यक्रमासाठी जाण्यापूर्वी त्यांनी येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. या वेळी त्यांनी भाजपावर टीका केली. भाजपाची कृती लोकशाही विरोधी आहे. ऑपरेशन लोटस याचा अर्थ पैसा द्यायचा



व आमदार फोडायचा असा आहे. जनतेला भाजपाची नीती समजली आहे असे ते म्हणाले. हर्षवर्धन पाटील यांना मोठी संधी मिळाली होती. त्यांच्याकडे क्षमता आहे. भाजपात जाऊन चुकले असे वाटते. त्यांचे व्यक्तिमत्व काँग्रेस विचारसरणीत घडले आहे, असे म्हणत त्यांनी हर्षवर्धन पाटील यांची पाठराखण केली. मराठा समाजाला न्याय मिळावा ही भूमिका आहे. पृथ्वीराज चव्हाण यांनी या बाबत प्रयत्न केला. आमची सत्ता गेली. त्यानंतर न्यायालयात बाजू मांडली नाही. मात्र १६ टक्के आरक्षण देणे शक्य आहे असे थोरात म्हणाले. मराठा समाजाला आरक्षण व संधी मिळाली पाहिजे मग कोणत्याही पद्धतीने मिळावी असे त्यांनी मत मांडले. राज्यात महायुती बाबत नाराजी आहे. तर दुसरीकडे महाविकास आघाडीमध्ये जागा वाटप अंतिम टप्प्यात आले असल्याचे थोरात यांनी सांगितले.

# बदलापूर, अंबरनाथला मिळणार अतिरिक्त पाणी उल्हास नदीतून आरक्षण मंजूर, योजना मार्गी लागणार

■ बदलापूर: नितीन देवळेकर

अंबरनाथ आणि बदलापूर शहरासाठी उल्हास नदीतून अतिरिक्त ७ दशलक्ष घनमीटर पाण्याचे आरक्षण मंजूर करण्यात आले आहे. त्यामुळे अंबरनाथमधील पाणी योजना मार्गी लागणार आहे. तर पाणी आरक्षणामुळे रखडलेली बदलापुरातील पाणी योजना मंजूर होणार आहे. दोन्ही शहरांच्या २५६ पर्यंत वाढणाऱ्या लोकसंख्येला पुरेल इतका पाणीसाठा यामुळे पदरात पडला आहे. आता पाणी योजना मार्गे लागल्यास या वाढीव आरक्षण मिळालेल्या पाण्याचा वापर करता येईल.

बदलापूर आणि अंबरनाथ शहराची पाणीपुरवठा व्यवस्था महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून चालवली जाते. बदलापूर शहराला उल्हास नदीवर बांधण्यात आलेल्या बॅरेज बंधाऱ्यातून पाणी पुरवले जाते. अंबरनाथ शहरालाही याच पाण्यातून काही भाग दिला जातो. अंबरनाथ शहराची लोकसंख्या पाहता अंबरनाथ पालिकेचे चिखलोली धरण शहराला सहा दशलक्ष लिटर पाणी देते. तर २० दशलक्ष लिटर पाणी महाराष्ट्र



औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून अंबरनाथ शहराला पुरवले जाते. बॅरेज बंधाऱ्याची क्षमता सुमारे १३० दशलक्ष लिटर इतकी आहे. त्यातील ७० दशलक्ष लिटर पाणी बदलापूर शहराला तर उर्वरित पाणी अंबरनाथ शहराला दिले जाते. मात्र दोन्ही शहरांची वाढती पाण्याची मागणी पाहता शासनाकडून २०५६ पर्यंत पुरेल इतक्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी अंबरनाथ आणि बदलापूर या दोन्ही शहरांसाठी वाढीव पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली. यातील अंबरनाथ शहराच्या पाणीपुरवठा योजनेला गती मिळाली आहे. तर तांत्रिक बाबींमुळे बदलापूर शहरातील पाणी योजना रखडली होती.

# ठाण्यात पुन्हा कचराकोंडीची चिन्हे; डायघर प्रकल्पास ग्रामस्थांचा विरोध, देयके मिळत नसल्याने ठेकेदाराने रोखल्या घंटागाड्या

■ ठाणे : तृप्ती गोरे

येथील डायघर भागातील कचरा प्रकल्प ठेकेदाराने देयके मिळत नसल्यामुळे घंटागाड्या प्रवेशद्वारावरच रोखून धरल्याने गेल्या दोन दिवसांपासून परिसरातील रस्त्यांवर घंटागाड्याच्या रांगा लागल्याने ग्रामस्थांनी प्रकल्पास विरोध दर्शविला. या प्रकारामुळे कळवा, दिवा आणि मुंब्रा भागातील कचरा संकलन ठप्प झाल्याने येथे रोगराईचा प्रश्न निर्माण झाला होता. तसेच प्रकल्पस्थळी अधिकाऱ्यांनी मारहाण करत जबरदस्तीने गाड्या सोडल्याचा आरोप करण्यात येत असून या वादानंतर ग्रामस्थांनी विरोधानंतर येथे कचरा टाकणे बंद करत पालिकेने डायघर येथे १४ वर्षानंतर कचराप्रकल्पाची उभारणी केली. याठिकाणी कचऱ्यापासून वीज निर्मीती केली जाणार असल्याचे पालिकेने म्हटले होते. गेल्या वर्षभरापासून येथे कचरा टाकण्यात येत आहे. परंतु याठिकाणी कचऱ्यावर कोणतीही प्रक्रीया करण्यात येत नसल्याचा आरोप करत ग्रामस्थांकडून प्रकल्पास विरोध होत आहे. त्यातच कामाचे देयक थकल्यामुळे ठेकेदाराने गेल्या दोन दिवसांपासून प्रकल्पास्थळी येणाऱ्या घंटागाड्या रोखून धरल्या होत्या. या वाहनांच्या रांगा परिसरातील रस्त्यांवर



लागल्याने दुर्गंधीमुळे ग्रामस्थ हैराण झाले. तसेच आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याने ग्रामस्थांमधून काही वाहनांना माघारी पाठविल्या. तसेच प्रकल्पात कचऱ्यावर कोणतीही प्रक्रीया होत नसल्याचा आरोप करत प्रकल्पास विरोध दर्शविला होता. यामुळे कळवा, दिवा आणि मुंब्रा भागातील कचरा संकलन ठप्प झाल्याने येथे रोगराईचा प्रश्न निर्माण झाला होता. यानंतर पालिकेच्या अधिकाऱ्यांनी शनिवारी सकाळी डायघर येथे जाऊन रोखून धरलेल्या घंटागाड्या प्रकल्पस्थळी सोडण्यास सुरूवात केली. परंतु यावेळी अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांना मारहाण केल्याचा आरोप होत आहे. प्रकल्पाविरोधात दंड थोपटल्याने शहरात कचराकोंडी निर्माण होण्याची चिन्हे आहेत. दरम्यान, प्रशासनाने मात्र दावा फेटाळून लावत शहरात कचरा संकलन ठप्प झाल्याने प्रकल्पस्थळी वाहने सोडल्याचे स्पष्ट केले आहे. ठाणे महापालिका क्षेत्रात दररोज १ हजार मेट्रीक टनच्या आसपास कचरा निर्माण होतो. त्यात ६० टक्के ओला तर, ४० टक्के सुका कचरा असतो. राज्य शासनाने ठाणे महापालिकेला भिवंडीतील आतकोली भागात कचराभुमीसाठी नुकतीच जागा देऊ केली आहे. परंतु याआधी स्वत:ची कचराभुमी नसल्यामुळे महापालिका दिवा भागात आणि त्यानंतर भांडर्ली कचरा टाकत होती. परंतु नागरिकांच्या

# इंद्राणी मुखर्जीच्या परदेशवारीस उच्च न्यायालयाचा नकार; सीबीआयची विरोध करणारी याचिका योग्य ठरवली

■ मुंबई : नितीन देवळेकर

शीना बोरा हत्याकांडातील प्रमुख आरोपी आणि शीनाची आई इंद्राणी मुखर्जी हिला युरोपला जाण्यास सीबीआयने केलेला विरोध उच्च न्यायालयाने शुक्रवारी योग्य ठरवला. तसेच, न्यायालयाने केलेली नाही, असे निरीक्षण न्यायमूर्ती श्याम चांडक यांच्या एकलपीठाने सीबीआयची याचिका योग्य ठरवताना नोंदवले. तसेच, इंद्राणीला पॉवर ऑफ ॲटर्नीद्वारे अथवा ऑनलाईन पद्धतीने भारतातूनच काही कामे करायची असल्यास सरकारने तिला सहकार्य करावे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. विशेष सीबीआय न्यायालयाने १९ जुलै रोजी इंद्राणी हिला तीन महिन्यांसाठी अधूनमधून १० दिवसांसाठी युरोप (स्पेन आणि युके) प्रवास करण्याची परवानगी दिली होती.



विशेष न्यायालयाने याबाबत दिलेला आदेश रद्द करून इंद्राणी हिच्या परदेशवारीस नकार दिला. इंद्राणीला परदेशात जाऊन काम करणे आवश्यक असल्याचे कोणतेही तार्किक कारणे विशेष न्यायालयाने तिची परदेशी जाण्याची मागणी मान्य करताना दिलेली नाहीत. तसेच, इंद्राणी हिचा अर्ज गुणवत्तेच्या आधारे मान्य करण्यात आल्याचे स्पष्ट करणारी टिप्पणीही विशेष विशेष न्यायालयाचा हा आदेश कायद्याच्या दृष्टीने चुकीचा आणि मनमानी असल्याचा दावा करून तो रद्द करण्याच्या मागणीसाठी सीबीआयने वकील श्रीराम शिरसाट यांच्यामार्फत उच्च न्यायालयात धाव घेऊन याचिका केली होती.

# शेवटची हिरवाई शिल्लक राहू द्या! नवी मुंबईतील क्रीडा संकुलाची जागा बिल्डरना देण्यावर सर्वोच्च न्यायालय नाराज

■ नवी दिल्ली : प्रगती शर्मा

नवी मुंबईमध्ये क्रीडा संकुल विकसित करण्यासाठी राखून ठेवलेली खुली जागा बांधकाम व्यावसायिकांना देण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली. राज्य सरकारचा हा निर्णय खेदजनक असल्याचे निरीक्षण सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी नोंदवले. आपल्याकडे आता अगदी कमी हरितक्षेत्र उरले आहे अशी टिप्पणीही त्यांनी केली. राज्य सरकारच्या २००३मधील एका आदेशानुसार, घणसोली येथील २० एकर जागा क्रीडा संकुलासाठी राखीव ठेवण्यात आली आहे. त्यात बदल करून, जागा खासगी बांधकाम व्यावसायिकांना देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. त्यानुसार, घणसोलीतील क्रीडा संकुलाची जागेचा काही भाग प्रोग्रेसिव्ह होम्स बिल्डर यांना देण्यासंबंधी सिडकोने अधिसूचना काढली होती. त्याविरोधात 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट्स'ने २०१९मध्ये उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती.



उच्च न्यायालयाने जुलै २०२४ मध्ये राज्य सरकारच्या निर्णयाविरोधात निकाल दिला होता. त्याला राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. राज्य सरकारच्या याचिकेवर सरन्यायाधीश चंद्रचूड आणि न्या. मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर २७ सप्टेंबरला सुनावणी झाली. संबंधित जागा बांधकाम व्यावसायिकांना देण्याचा निर्णय घेताना राज्य सरकारने तसेच प्रस्तावित क्रीडा संकुल ११५ किलोमीटर अंतरावर, रायगड जिल्ह्यातील नाणोरे येथे हलवण्याचा निर्णय घेतला आहे.

# कल्याणमध्ये तलवार हातात घेऊन हल्लेखोराचा तरूणाला मारण्याचा प्रयत्न

■ कल्याण : आकाश कांबळे

कल्याण पश्चिमेतील वसंत व्हॅली भागात एका हल्लेखोर तरूणाने तलवार हातात घेऊन एका तरूणाचा पाठलाग करून त्याला जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना सीसीटीव्हीच्या माध्यमातून उघडकीला आली आहे. ही दृश्यचित्रफिती समाज माध्यमांवर प्रसारित झाली आहे. तरूण बिनधास्तपणे हातात तलवारी घेऊन वावरत असल्याने त्यांना पोलिसांचा धाक आहे की नाही, असे प्रश्न नागरिक करत आहेत. याप्रकरणी आर्यन पाटील आणि त्याच्या चार साथीदारांविरुध्द खडकपाडा पोलीस ठाण्यात तक्रारदार सत्कार भोईर याच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.





सत्कार भोईर थोडक्यात या हल्ल्यातून बचावला आहे. आर्यन पाटील याने एका वाहनाला धडक देऊन वाहनातील प्रवाशांना जखमी केले होते. याप्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाली होती. साक्षीदार म्हणून सत्कार भोईर याने आर्यन पाटीलसह त्याच्या इतर साथीदारांची नावे पोलिसांना सांगितली होती. सत्कारमुळे आपली नावे पोलिसांना समजली. त्यामुळे पोलिसांनी आपल्याला आरोपी केल्याचा राग आर्यन आणि त्याच्या मित्रांना आला होता. ते सत्कार भोईरला याप्रकरणी जाब विचारणार होते. पण सत्कार त्यांच्या तावडीत सापडत नव्हता.

# 'अनुदानाच्या पैशांची शाश्वती नाही, कारण लाडकी बहीण योजना...', नितीन गडकरींच्या विधानाची चर्चा

■ मुंबई : नितीन देवळेकर

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे त्यांच्या विकासाभिमुख प्रकल्पांसाठी ओळखले जातात. त्यांचे रस्ते बांधणी व वाहतूक व्यवस्थापन प्रकल्पांचं काम देशभरात चर्चेत राहिलं आहे. तसेच नितीन गडकरी राजकीय विषयांवरही स्पष्टपणे बोलतात आणि स्पष्ट भूमिका मांडताना अनेकदा पाहायला मिळतात. त्यामुळे त्यांच्या विधानाबद्दल अनेकदा चर्चा झाल्याचं पाहायला मिळातं. आता त्यांच्या आणखी एका विधानाची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा रंगली आहे. नितीन गडकरी यांनी नागपूरमध्ये आयोजित उद्योगांसंदर्भातील एका कार्यक्रमात बोलताना गुंतवणुकदारांना एक सल्ला दिला आहे. 'गुंतवणुकदारांनी सरकारच्या भरोशावर राहू नये, अनुदानाच्या पैशांची शाश्वती नाही, कारण लाडकी बहीण योजनेलाही पैसे द्यावे लागतात', असं नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. नितीन गडकरी काय म्हणाले? 'माझं तर म्हणणं आहे की कोणत्याही पक्षाचं सरकार असूद्या. गुंतवणूकदारांनी सरकारला बाजूला ठेवलं पाहिजे. सरकार हे विषकन्या असते. ज्यांच्या बरोबर जाते त्यांना बुडवते. तुम्ही त्यांच्या भरोशावर राहू नका. तुम्हाला अनुदान घ्यायचं आहे घ्या. मात्र, अनुदान कधी मिळेल, कधी नाही याचा काहीही भरोसा नसतो', असं नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. ते पुढे म्हणाले, 'एका जणाने सांगितलं की साडेचारशे कोटी अनुदान आले आहे. टॅक्सचे पैसे जमा आहेत.



पुढे त्यांनी विचारलं की पण ते पैसे कधी मिळतील? मी त्यांना म्हटलं परमेश्वराला प्रार्थना करा. कारण काही भरोसा नाही. मग मिळणार का? जेव्हा येईल तेव्हा मिळू शकतात. अनुदानाचे पैसे मिळतील का? याची शाश्वती नाही. कारण लाडकी बहीण योजनेतही पैसा द्यावा लागतो', असं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. दरम्यान, महायुती सरकारने सुरु केलेल्या 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने'ची राज्यात मोठी चर्चा सुरु आहे. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील लाभार्थी महिलांना महिन्याला १५०० रुपये त्यांच्या खात्यात जमा केले जातात. जवळपास अडीच कोटी लाभार्थी महिलांना या योजनेचा लाभ देण्याचा महायुती सरकारचा उद्देश असल्याचं सांगितलं जात आहे. मात्र, या 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने'वर महाविकास आघाडीचे नेते सातत्याने टीका करत आहेत. काही दिवसांपूर्वी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही लाडकी बहीण योजनेवरून सरकारवर टीका केली होती. 'जानेवारीत पगार द्यायला सरकारच्या तिजोरीत पैसे राहणार नाहीत', असं राज ठाकरे म्हणाले होते. यातच आता भाजपाचे नेते, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही यासंदर्भात एक विधान करत 'गुंतवणुकदारांना अनुदानाचे पैसे मिळतील का? याची शाश्वती नाही. कारण लाडकी बहीण योजनेतही पैसा द्यावा लागतो', असं नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे.